सोमवार
१९.०५.२०२५
किंमत २ रूपये
वर्ष २९ वे अंक १९ पाने ०८
R.N.I.No.MAHMAR./2001/10338
http://epaper.pritisangam.in

# प्रीतिसंगम



## संपादकीय

# ठोकशाहीचे कवित्व

सत्ता आहे म्हणून त्याचा गैरवापर करून विरोधी पक्षांच्या लोकांना तुरुंगात डांबणे ही लोकशाही नाही, तर ठोकशाही आहे. याविरोधात एकत्र येणे काळाची गरज आहे, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) अध्यक्ष शरद पवार व ठाकरे शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सत्ताधार्यांवर टीका केली. खासदार संजय राऊत यांनी लिहीलेल्या नरकातला स्वर्ग या पुस्तक प्रकाशनवेळी सत्ताधार्यांवर ठाकरे आणि पवारांनी ही टीका केली आहे. यावेळी राज्यातील विरोधी पक्षांचे नेते उपस्थित होते. उपकारांची फेड कृतज्ञ नीतीने करायची की अपकाराने करायची हे ज्याच्या त्याच्यावर असते. कोणाला मदत करताना असा विचार आपण करू शकत नाही, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे. देशातील आजची राजकीय आणि सामाजिक स्थिति पाहिली तर लक्षात येईल की, आज सर्वसामान्य माणसावर अन्याय होत आहे. सर्वसामान्य नागरिकांची बाजू घेऊन लढणारे विरोधक आज देशद्रोही बनले आहेत. सरकारी धोरणांना विरोध करणारे ते राष्ट्रद्रोही अशी नवीन व्याख्या बनवली जात आहे, हे लोकशाही बाजूला गेल्याचे उदाहरण वाटते. केंद्र सरकारच्या भूमिकेला विरोध करणे म्हणजे मोठी चूक असा गैरसमज सर्वत्र पसरवला जात आहे. त्यासोबत झुंडशाही वाढत आहे. पत्रकार वा साहित्यिक आज सरकारविरोधात लिहू शकत नाही किंवा बोलू शकत नाही. जर बोलला किंवा लिहिले तर त्याच्याविरोधात केंद्र सरकारच्या काही यंत्रणा काम करतात असे दिसते. यामुळेच विरोधी पक्षनेते शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांनी सररकारच्या ठोकशाहीचा मुद्दा उपस्थित केलेला दिसत आहे.

जेव्हा नरकातला स्वर्ग हे लेखक संजय राऊत यांचे पुस्तक प्रकाशनाच्या वाटेवर होते, त्यावेळी भाजपाच्या अनेक नेत्यांनी संजय राऊत यांची खिल्ली उडवली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले होते की, मी बाल वाङ्मय वाचत नाही. फडणवीस यांच्या बोलण्यातील खोच अशी होती की, बालसुलभ लेखन मी वाचत नाही. बाळबोध लेखन ते वाचत नाहीत संजय राऊत हे ज्येष्ठ पत्रकार आहेत. त्यांनी लिहिलेले लेखन हे वैचारीक असावे ; असा समज आहे. परंतु राऊत हे नेहमी सत्ताधारी पक्षावर वा भाजपवर टीका करत असल्यामुळे त्यांचे लेखन विचार करण्यासारखे नाही, असाच अर्थ फडणवीस यांनी ध्वनित केला आहे असे दिसते. याचा अर्थ सरकार विरोधकांच्या टीकेला कोणतीही भीक घालत नाही, असेच फडणवीसांना सुचवायचे आहे असे दिसते. तसेच भाजपचे महाराष्ट्रातील दुसरे नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी राउतांच्या पुस्तकाबद्दल म्हटले की, पुस्तकाचे नाव नरकातील राऊत असे असायला हवे होते. सत्ताधारी पक्षातील नेते साहित्याबद्दल संकुचित मनाचे असावेत का ? असा प्रश्न यामुळे निर्माण होत आहे. यावरून सरकार कोत्या विचाराचे आहे, असे दिसते.

शरद पवार यांनी भाजपाच्या तत्कालीन राज्य सरकारच्या काळातील आठवण कथन केली. शरद पवार म्हणाले, अनिल देशमुखांवर एका शासकीय अधिकार्याने जी तक्रार केली होती, ती १०० कोटींचा भ्रष्टाचार केल्याच्या आरोपाची होती. शेवटी न्यायालयात ही केस उभी राहिली तेव्हा १ कोटीचा भ्रष्टाचार केला, असा आरोप त्यांच्यावर झाला; पण ही सगळी मंडळी नमली नाहीत. संकटातून बाहेर कसे निघता येईल याचा विचार त्यांनी केला. याचा अर्थ सरकारकडे नीतीमत्ता शिल्लक राहिलेली नाही, असेच पवारांना म्हणायचे आहे. गेल्या तीन वर्षांत राज्यातील राजाकरण जसे झपाट्याने बदलले आहे, त्याचे कारण केंद्र सरकारच्या मदतीने राज्यात ठोकशाहीला चालना मिळाली. या ठोकशाहीच्या काळात भाजपाच्या नेत्यांनी राज्यातील दोन प्रादेशिक पक्षांमध्ये फुट पाडली. प्रादेशिक पक्षांचे दोन तुकडे केले. राज्यात प्रादेशिक पक्षांची ताकद कमी केली. त्यामुळे राज्यात अनेक जन स्वार्थासाठी सत्ताधारी पक्षाकडे जाऊ लागले. राज्यातील प्रादेशिक पक्षांची ताकद विभागल्यामुळे येथील राजकीय संस्कृतीत बरेच बदल झाले आणि राज्यात अस्थिरता निर्माण झाली.

समारंभाचे अध्यक्ष ज्येष्ठ लेखक जावेद अख्तर म्हणाले, मुंबईत मला तीन वेळा मुल्लांच्या धमक्यांमुळे संरक्षण दिले गेले. दोन्ही बाजूचे कट्टरपंथीय मला शिव्या घालतात. एक म्हणतात तू काफीर आहेस, नरकात जाशील. दूसरे म्हणतात, तू जिहादी, पाकिस्तानला निघून जा. आता मला पाकिस्तान आणि नरक असे पर्याय दिले, तर मी नरकाचा पर्याय निवडेन. देशात कट्टरपंथीय वाढले आहेत, असेच जावेद अख्तर यांच्या वक्तव्यापासून सूचित होते. देशात हिंदू - मुस्लिम असा धर्मभेद अलिकडच्या १० वर्षांत वाढलेला दिसतो. याला कारण सत्ताधारी नेते धार्मिक भावना भडकावत आहेत आणि त्याचा परिणाम समाजावर होत आहे. आंतरराष्ट्रीय धार्मिक सर्वेक्षण करणार्या संस्थांनी भारतातील धार्मिक अहवाल जाहीर केला, त्यात म्हटले आहे की, भारतात धार्मिक गोष्टींवरून चिथावणी दिली जाते. अल्पसंख्याकांवर झुंडशाही करून अत्याचार केले जातात. परंतु हा अहवाल भारताने नाकारला आणि भारताने म्हटले होते की, भारत सरकारची नाचक्की केली जात आहे.

पीएमएलए कायद्यात बदल करण्याची गरज असून देशात परिवर्तन झाल्यावर हे काम प्राधान्याने केले जाईल, असे वक्तव्य संजय राऊत यांच्या पुस्तक प्रकाशनवेळी शरद पवार यांनी केले आहे. पवारांनी यावेळी निरीक्षण नोंदवले की, न्यायव्यवस्थेनेही या घटनांकडे गंभीरपणे बघायला हवे. ईडीला मिळालेल्या शक्तीमुळे ईच्छा असूनही न्यायव्यवस्थेला मर्यादा जाणवते. केंद्रीय मंत्रिमंडळात ईडीला अटकेसह विविध अधिकार बहाल करणार्या दुरूस्त्या जेव्हा पैशाची अफरातफर प्रतिबंधक (पीएमलए) कायद्यात प्रस्तावित करण्यात आल्या तेव्हा मी या सुधारणांना विरोध केला होता. हे अधिकार ईडीला देऊ नका, असे मी तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांना सुचविले होते. ईडीने आरोपी दोषी आहे हे सिध्द करण्याऐवजी आपण निर्दोष आहोत हे सिध्द करण्याची जबाबदारी आरोपींवर सोपविणार्या दुरूस्तीला मी विरोध करीत असतानाही त्या मंजूर करण्यात आल्या.

### पाकिस्तानकडे असलेले नौदलातील माजी अधिकारी

# कुलभूषण जाधव यांची भारत सरकारने सुटका करुन घ्यावी

**वाचकाचे पत्र...**

नुकताच पहलगाम दहशतवादी हल्ला झाला त्याला भारताने चोख प्रत्युत्तर दिले असले तरी या संघर्षात भारताने एका पाकिस्तानी वैमानिकाला ताब्यात घेतले आहे पाकिस्तानने जर त्याची सुटकेची मागणी केली आणि भारताने तसा निर्णय घेतला तर त्या बदल्यात भारताने कुलभूषण जाधव यांची सुटका करुन घेतली पाहिजे नौदलातील माजी अधिकारी कुलभूषण जाधव हे स्वेच्छा निवृत्ती घेऊन इराणमधील चाबहार येथे व्यवसाय करत होते.

२०१६ मध्ये, त्याचे इराण-पाकिस्तान सीमेजवळून अपहरण करण्यात आले सद्या भारतीय नौदलाचे माजी अधिकारी कुलभूषण जाधव हेरगिरीच्या कारणांवरुन पाकिस्तानच्या जेलमध्ये बंद आहेत. पाकिस्तानचा दावा आहे की, कुलभूषण जाधव यांना पाकिस्तानच्या सुरक्षा यंत्रणांनी ३ मार्च २०१६ रोजी गुप्तहेर आणि दहशतवादी कारवाईच्या आरोपाखाली अटक केली आहे. कुलभूषण जाधव यांना बलुचिस्तान येथून अटक करण्यात आलं होतं. त्यानंतर पाकिस्तान कोर्टाने जाधव यांना मृत्युदंडाची शिक्षा दिली होती.

मात्र पाकिस्तानने केलेल्या दाव्याचा भारताने कडाडून विरोध केला असून आंतरराष्ट्रीय न्यायालयाने फाशीच्या शिक्षेला मनाई केली आहे सद्या संधी चालत आल्याने भारत सरकारने पाकिस्तानकडून जाधवांची सुटका करुन घेणे अपेक्षित आहे !

**राजू जाधव, मांगूर जि. बेळगांव**

# पाकिस्तानसाठी हेरगिरी..!

पहलगाम दहशतवादी हल्ला आणि पाकिस्तानसोबत झालेल्या लष्करी संघर्षानंतर देशातील सुरक्षा यंत्रणा खडबडून जाग्या झाल्या आहेत. भारतीयांकडूनच पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याची प्रकरणे समोर आली आहेत. असेच एक प्रकरण समोर आले आणि अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला. पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली युट्यूबर ज्योती मल्होत्रा या तरुणीला नुकतीच अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी एकामागून एक खुलासे होत आहेत. हरियाणातील हिसार येथील रहिवासी ज्योती पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआयच्या तीन अधिकाऱ्यांच्या संपर्कात होती आणि त्या तिघांच्या खूप जवळची होती. पाकिस्तान दूतावासात काम करणार्या दानिशने ज्योतीची या अधिकाऱ्यांशी ओळख करून दिल्याचे उघड झाले आहे. दिल्लीतील पाकिस्तानी दूतावास व्हिसा देण्याच्या नावाखाली आयएसआय नेटवर्क चालवत आहे. पाकिस्तानला जाण्यासाठी व्हिसा मागणार्या लोकांना जाळण्यात ओढण्याचा प्रयत्न केला जातो, जर लोक सहमत नसतील, तर त्यांचा व्हिसा नाकारला जातो. आयएसआय अशा लोकांना शोधत राहते, ज्यांना कोणत्याही परिस्तितीत पाकिस्तानला जाण्यासाठी व्हिसा मिळवायचा आहे. ज्योतीदेखील अशाच प्रकारे आयएसआयच्या संपर्कात आली.





**अशोक सुतार**

**कृष्णाकाठ...**

ज्योतीच्या या प्रकरणावर प्रकाशझोत आल्याने भारतातील काही रहिवाश्यांना पाकिस्तानशी संबंध ठेवून हेरगिरी करायला लावले जाते, हे उघड झाले आहे. आयएसआय ही पाकिस्तानशी संबंधित गुप्तहेर संघटना असून भारतातील लोकांशी ही संस्था कोणत्या ना कोणत्या कारणाने संपर्कात राहण्याचा प्रयत्न करते. युट्यूबर ज्योती ही हरियाणा पॉवर डिस्कमच्या निवृत्त अधिकाऱ्याची मुलगी आहे. ती पदवीधर असून, तिचे यू ट्यूबवर ३.२१ लाख फॉलोअर्स आहेत. तिने पाकिस्तान दौर्याचे व्हिडिओ चॅनेलवर अपलोड केले आहेत. पाकिस्ताच्या दौर्यादरम्यान ज्योतीची पाकिस्तानी दूतावासातील अधिकारी दानिशशी ओळख झाली. दानिशला हेरगिरीच्या आरोपाखाली १३ मे रोजी देशातून हाकलून लावण्यात आले होते. तो व्हॉट्सॲप, स्नॅपचॅट आणि टेलिग्रामसारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मद्वारे पाकिस्तानला संवेदनशील माहिती पाठवत असे. २०२३ मध्ये जेव्हा ज्योतीला पाकिस्तानला जायचे होते, तेव्हा ती व्हिसा मिळविण्यासाठी पाकिस्तानी दूतावासात गेली. याच काळात तिची भेट दानिशशी भेट झाली. यानंतर ती दानिशला अनेक वेळा भेटल्याचा आरोप आहे. ती पाकिस्तानी गुप्तचर संस्थेच्याही संपर्कात होती. पाकिस्तानात पोहोचल्यावर दानिशच्या ओळखीचा अली अहवान याने ज्योतीला मदत केली. पोलिस आता याबाबत ज्योतीची चौकशी करत आहेत.

भारत आणि पाकिस्तानमधील संबंध ताणले गेले असतानाच पाकिस्तानी हेरांच्या संपर्कात असलेल्या ज्योती मल्होत्राला भारताच्या सुरक्षा यंत्रणांनी नुकतीच अटक केली होती. हे प्रकरण ताजे असतानाच सुरक्षा यंत्रणांनी हरयाणामधील नूंह येथून आणखी एका पाकिस्तानी गुप्तहेराला बेड्या ठोकल्या आहेत. हरीयाणा पोलीस आणि केंद्रीय तपास यंत्रणांनी नूंह जिल्ह्यातून अरमान या पाकिस्तानसाठी हेरगिरी करणाऱ्या तरुणाला अटक केली आहे. त्याच्याविरोधात देशद्रोहाच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी याबाबत दिलेल्या अधिक माहितीनुसार, अरमान हा बऱ्याच काळापासून भारतीय लष्कर डिफेन्स एक्स्पो - २०२५ आणि लष्कराशी संबंधित संवेदनशील माहिती व्हॉट्सॲपच्या माध्यमातून पाकिस्तानला पाठवत होता. ही माहिती देशाचे संरक्षण आणि रणनीतिक तयारीच्या दृष्टीने गंभीर होती. एक तरुण सोशल मीडिया आणि व्हॉट्सॲपच्या माध्यमातून देशाच्या शत्रूंना माहिती पुरवत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे त्वरित कारवाई करत पोलिसांनी अरमान याला ताब्यात घेतले आहे.

अरमानच्या मोबाईल फोनची तपासणी केली असता पाकिस्तानच्या +९२ क्रमांकाने सुरू होणाऱ्या फोन नंबरवर चॅट, कॉल लॉग, फोटो आणि व्हिडीओ सापडले. त्यातही विशेष करून डिफेन्स एक्स्पो - २०२५ चे फोटो आणि लष्करी हालचालींशी संबंधित इतर माहितीही मिळाली. आरोपीकडून दोन मोबाईल फोन आणि दोन सिमकार्ड जप्त करण्यात आली आहेत. यांचा वापर आरोपी हेरगिरीसाठी करत होता. त्याशिवाय अन्य एका मोबाईल फोनवरूनही आरोपी संशयास्पद हालचाली करत होता. अरमानचे हे नेटवर्क किती मोठे होते आणि या नेटवर्कमध्ये कितीजण सामील होते, याचा शोध पोलीस आणि केंद्रीय तपाय यंत्रणांकडून घेतला जात आहे. अरमान याने लष्करी तळ, संरक्षणविषयक कार्यक्रम आणि लष्कराच्या संभाव्य हालचालींची माहिती आणि इतर महत्त्वपूर्ण माहिती आयएसआयला दिली होती, असे समजते. ही माहिती सामरिकदृष्ट्या महत्त्वाची होती. आता या प्रकरणी आरोपीविरोधात भादंवि कलम १५२ आणि ऑफिशियल सिक्रेट ॲक्ट, १९२३ आणि देशद्रोहाशी संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यु ट्यूबर ज्योती मल्होत्रा प्रकरणाला झालेल्या अटकेनंतर देशभरात खळबळ उडाली आहे. ज्योती मल्होत्राला पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आले आहे. त्यानंतर केंद्रीय गुप्तचर तपास यंत्रणेने सगळीकडे झाडाझडती सुरू केली आहे. यातच एक नवीन नाव समोर आले आहे. प्रियंका सेनापती असे संशयाच्या भोवऱ्यात असलेल्या या यु ट्यूबरचे नाव आहे. आयबी (इंटेलिजन्स ब्युरो) अर्थात केंद्रीय गुप्तचर यंत्रणेकडून प्रियंकाची चौकशी सुरू करण्यात आली आहे. हरयाणाच्या हिसारमधील प्रसिद्ध यु ट्यूबर ज्योती मल्होत्राचे पाकिस्तानच्या गुप्तचर यंत्रणेसोबतचे कनेक्शन उजेडात आल्यानंतर गुप्तचर यंत्रणांनी आता देशभरात पाकिस्तानचे हस्तक बनलेल्यांचा शोध सुरू केला आहे. ज्योती मल्होत्राला अटक केल्यानंतर तिचे यु ट्यूबर प्रियंका सेनापतीसोबतही फोटो दिसून आले. तिचाही यात सहभाग आहे का याबद्दल शंका उपस्थित होत आहेत. या प्रकरणात आयबीचे अधिकारी ओडिशातील पुरी पोलिसांच्या सहकार्याने प्रियंका सेनापतीपर्यंत पोहोचले. आयबीकडून तिची चौकशी करण्यात आली. सप्टेंबर २०२४ मध्ये ज्योती मल्होत्रा पुरीला गेली होती. याच वेळी तिने जगन्नाथ मंदिर आणि आजूबाजूच्या सरकारी कार्यालयांचे फोटो आणि व्हिडीओ तिने शूट केले होते. या ठिकाणांची माहिती डिजिटल प्लॅटफॉर्मच्या मदतीने पाकिस्तानातील गुप्तचर यंत्रणांना तिने पाठवल्याचा संशय भारतीय गुप्तचर यंत्रणांना आहे. ज्योति जेव्हा पुरीला फिरायला गेली, त्याचवेळी तिची आणि प्रियंका सेनापतीची भेट झाली होती. दोघींची भेट आणि संबंधाबद्दल गुप्तचर यंत्रणांना संशय आहे. त्यामुळेच आयबीने आता तिची चौकशी केली आहे.

प्रियंका सेनापती हिने म्हटले आहे की, ज्योती माझी मैत्रीण होती. मला तिच्या चुकीच्या कामांबद्दल माहिती नव्हती. जर माहिती असते की, ती शूत्र देशासाठी हेरगिरी करत आहेत, तर मी तिच्याशी संपर्कच ठेवला नसता. मी तपासात पूर्ण सहकार्य करण्यास तयार आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारतातील सुरक्षा यंत्रणा जाग्या झाल्या असून भारतातील पाकीस्तानसाठी हेरगिरी करणारांवर कडक लक्ष ठेवले आहे.

# विद्वेषक वक्तव्य आणिं निर्लज्ज नेते



**रमेश लांजेवार**
**नागपूर**

पहलगाम आतंकवादी हल्लानंतर भारताने आतंकवाद विरोधी व आतंकवाद्यांना खतपाणी घालणाऱ्या पाकिस्तानला भारतीय सेनेने चांगलाच धडा शिकवुन चपराक दिली व पाकिस्तानला पाणी-पाणी करून सोडले आणि जगातील अनेक देशांनी ऑपरेशन सिन्दुरची प्रशंसा सुध्दा केली व भारतासोबत आम्ही उभे आहोत अशी ग्वाही सुध्दा दिली. यामुळे अमेरिका, चीन, तुर्की सुध्दा हादरला. परंतु देशातील काही बेवकुफ, निर्लज्ज व बेजबाबदार राजकीय पुढारी असे बोलतात की जणुकाय तेच सिमेवर लढाईला गेले की काय असे वाटते!ते काय खातात कल्पना नाही. कारण ते समाजाबद्दल वाट्टेल बोलुन विष ओकत असतात, भेदभाव निर्माण करतात, देशाच्या सुरक्षेव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित करतात, ज्यांच्यापुढे देशाची १४० कोटी जनता नतमस्तक आहे आणि होते अशा कर्नल सोफिया कुरैशी, विंग कमांडर व्योमिका सिंह आणि संपूर्ण सैन्य शक्तीवर जर कोणी प्रश्नचिन्ह उपस्थित करीत असेल तर तो कोणीही असो त्याला देशद्रोहीच म्हणावे लागेल आणि देशद्रोहाची शिक्षा व्हायलाच हवी.

घृणास्पद आणि बेजबाबदारपणाचे वक्तव्य करणारे लोक अन्न खातात की आणखी काय खातात कल्पना नाही! सर्वप्रथम कर्नर सोफिया कुरैशी यांच्या बद्दल मध्यप्रदेशचे आदिवासी कल्याण मंत्री विजय शाह यांनी विष ओकले व अप्रत्यक्षरीत्या धर्माच्या नावावर बेताल वक्तव्य करून सेनेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले,यानंतर सपा प्रमुख रामगोपाल यादव यांनी वादग्रस्त टिप्पणी करतांना व्योमिका सिंह यांची जात रामगोपाल यांनी नमूद केली आणि म्हणाले विंग कमांडर व्योमिका सिंह ही हरियाणाची जाटव आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये कारवाई करणारे एअर मार्शल अवधेश कुमार भारती यादव हे आहेत. एक मुस्लिम, दुसरा जाटव आणि तिसरा यादव हे युध्द फक्त पीडीए (मागासवर्गीय, दलित, अल्पसंख्याक) यांनीच लढले. अशाप्रकारे घृणास्पद वक्तव्य करून रामगोपाल यादव यांनी जाती-जातीमध्ये दरार निर्माण करण्याचे काम करून जातीयवादाचे जहर पसरविण्याचे काम केले.जेव्हा-जेव्हा भारतीय सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो तेव्हा-तेव्हा संपूर्ण भारतवर्ष एकत्र येतो प्रश्न रहाला सुरक्षा व्यवस्थेचा सुरक्षा व्यवस्थेमध्ये किंवा सेनेमध्ये जात-पात, धर्म याला कोणत्याही प्रकारचा थारा नसतो. सैनिकांचा व सुरक्षा व्यवस्थेचा एक उद्देश असतो देशाची व देशवासीयांची रक्षा करने. परंतु देशात काही नालायक राजकीय पुढारी आताही दिसून येतात आणि बेजबाबदार वक्तव्य करून निघून जातात व नंतर सावसावर करण्यासाठी माफी मांगतात इतके बेशरम असतात हे लोक.जीभेला हाड नसलेले उच्च पदस्थ मध्यप्रदेशचे उपमुख्यमंत्री जगदीश देवडा यांनी भारतीय सैन्यदलांबाबद वादग्रस्त वक्तव्य करून देशाच्या एकतेला धक्का देण्याचे काम केले.ते म्हणतात देश सैन्यदल आणि सैनिक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चरणांशी नतमस्तक झाले आहेतअसे वक्तव्य जगदीश देवडा यांनी करून त्यांची स्वतःची काय लायकी आहे हे दाखवून दिले.

जगदीश देवडा यांना कदाचित देशाबद्दल व देशाच्या प्रधानमंत्र्यांबद्दल काहीच कल्पना नसावी ऑपरेशन सिन्दुरने जी बहाद्दूरी दाखविली आणि पाकिस्तानला जमीनीवर लोळवले त्या संपूर्ण सैन्य शक्तीला प्रधानमंत्री माननीय नरेंद्र मोदी सॅल्युट मारतात व नतमस्तक होतात आणि सैन्यामध्ये नव्याने ऊर्जा निर्माण करण्यासाठी सिमावर्ती भागात दौरा करतात म्हणजे आज संपूर्ण देशाची १४० कोटी जनता व स्वतः प्रधानमंत्री भारतीय सैन्य शक्तीपुढे नतमस्तक आहेत आणि जगदीश देवडा बेजबाबदारपने वक्तव्य करून देशवासीयांमध्ये भ्रम निर्माण करण्याचे काम करतात हा अत्यंत गंभीर विषय आहे. हीबाब सत्य आहे की प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे देशाचे खंबीर नेतृत्व आहे यात दुमत नाही. कारण आज भारत तिसरी महाशक्ती होण्याच्या वाटेवर आहे आणि भारत किती शक्तीशाली देश आहे ही बाब ऑपरेशन सिन्दुर मध्ये संपूर्ण जगाने उघड्या डोळ्यांनी पाहीली.हे संपूर्ण दृष्य डोळ्यासमोर असुनही बेजबाबदार व बेताल वक्तव्य करणारे विजय शाह, रामगोपाल यादव व जगदीश देवडा यांची वक्तव्य वेगवेगळे जरी असले तरी ते सैन्य विरोधी,देश विरोधी व देशाच्या १४० कोटी जनतेला ठेच पोहचविणारे आहेत.यांच्यावर सर्वच स्तरातून टिका सुध्दा झाल्यात तरीही आपापल्या पदावर विराजमान आहेत यावरून स्पष्ट होते हे लोक किती बेशरम असतात.

सरकारने यांच्यावर कठोर कारवाई केली नाही तर हे असेच ओकत रहातील. त्यामुळे अशा राजकीय पुढाऱ्यांना त्यांची योग्य जागा दाखविने सरकारचे व न्यायपालिकेचे कर्तव्य आहे. विद्वेषक वक्तव्य करणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांना हात जोडून विनंती करतो की,देश हितासाठी थोडीशी तरी जनाची नाही तर मनाची लाज ठेवा! राजकारणात तुम्ही काहीही करा! परंतु देशाच्या सैन्य शक्तीला व सुरक्षेला कुठे ठेच पोहचणार नाही याची काळजी घ्या.यातच खरे देश हित आहे.जय हिंद!



# मुलांनो मैदानात या...





**श्याम ठाणेदार**
**पुणे**

आजचे युग हे विज्ञान तंत्रज्ञानाचे युग समजले जाते. २१ व्या शतकातील या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात स्मार्ट फोन, इंटरनेट हे प्रत्येकाच्या जीवनातील अविभाज्य घटक बनले आहेत. केवळ घरातील मोठ्या माणसंकडेच नव्हे तर शाळकरी मुलांकडे देखील मोबाईल फोन पाहायला मिळत आहे. कोरोना काळात ऑनलाइन शिक्षणासाठी पालकांनी घेऊन दिलेला मोबाईल अजूनही मुलांच्या हातात आहे. हाच मोबाईल आज मुलांचा सर्वात जवळचा सहकारी बनला आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मुले मोबाईललाच चिकटून बसलेली असतात. आजच्या विज्ञान तंत्रज्ञान युगात मोबाईल हा गरजेचा आहे. तो गरजेपुरातच वापरला गेला पाहिजे मात्र आज मुलांसाठी मोबाईल हेच सर्वस्व होऊन बसले आहे. आजच्या मुलांना मोबाईलने भुरळ घातली आहे. दिवसातील पाच ते दहा तास मुले मोबाईल वरच असल्याने मुलांची शारीरिक व बौद्धिक वाढ खुंटत चालली आहे त्यामुळे मुलांचे बालपण हरवत चालले की काय अशी शंका मनात येते. आजची मुले जास्त प्रमाणात टीव्ही, संगणक, मोबाईल, इंटरनेट, व्हिडीओ गेम, व्हाट्सएप, फेसबुक, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडियात दंग असतात. तंत्रज्ञानरुपी राक्षसानं मुलांचं बालपणच खाऊन टाकलंय. पूर्वी शाळांना सुट्ट्या लागल्या की गावागावातील मैदाने मुलांनी भरून गेलेली असायची पण आज ती मैदाने विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात ओस पडली असल्याचे चित्र पाहायला मिळते. क्रिकेट वगळता एकही मैदानी खेळ खेळताना मुले दिसत नाहीत. देशी खेळ तर आजच्या मुलांना माहीतच नाहीत. गोट्या, भोवरे, विटीदांडू खेळताना कोणी दिसत नाही. आट्यापाट्या आणि सुरपारंब्या या खेळाचे नियम तर सोडाच पण नावही आजच्या मुलांना माहीत नाही. मोठे रिंगण घेऊन त्यात गोट्यांचा डाव लावल्याचे चित्र आज पाहायला मिळत नाही. गलगुट करून खेळणे व त्यावर राज्य द्यावे लागल्याचे हल्लीच्या मुलांमध्ये ऐकिवातही नाही. भोवऱ्याच्या रिंगणाचीही तीच अवस्था. दगडावर आरी घासून भोवऱ्याला टोक करीत बसलेला मुलगा शोधूनही सापडेनासा झाला आहे. जुन्या कपड्यांचा चेंडू तयार करून खेळला जाणारा रप्पाधप्पीचा खेळ हल्लीच्या मुलांना माहीतही नाही. लपंडाव, विटीदांडू,, लगोरी, कुत्रघोडी, चंपूल, उडाणटप्पू हे खेळ आता दुर्मिळ झाले आहेत. लंगडी हा खेळ आता फक्त शाळेतील पिटी च्या तासापूरता उरला आहे. या खेळांमुळे मुलांचा शारीरिक व्यायाम व्हायचा शिवाय संघभावना, एकी, आपुलकी, नेतृत्व हे गुण या खेळांमुळे मुलांमध्ये विकसित व्हायचे. या खेळाची जागा आता टीव्ही, संगणक, मोबाईल व्हिडीओ गेम यांनी घेतली आहे. टीव्ही, संगणक, व्हिडीओ गेममुळे मुलांना विविध खेळांची माहिती उपलब्ध होऊन त्यातून मुलांचा बौद्धिक विकास होतो असे वाटत असले तरी त्यांचा शारीरिक विकास खुंटत चालला आहे याचा समाजातील सर्व घटकांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

# मुलापेक्षा मुलगी बरी!



**किशोर जाधव**
**सोलापूर**

'मुलापेक्षा मुलगी बरी प्रकाश देते दोन्ही घरी', अशी स्त्री-पुरुष समानतेचा संदेश देणारी जाहिरात एकेकाळी प्रसार माध्यमावरून ऐकवली जात होती. दहावी-बारावीचा निकाल लागल्यानंतर या जाहिरातीची आठवण आवर्जून होत आहे. कारण दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी महाराष्ट्रात बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या मुलींचे शेकडा प्रमाण ९४. ९८ टक्के आहे, तर मुलांचे प्रमाण ८९.५१ टक्के आहे. म्हणजेच मुलींचा निकाल मुलांपेक्षा ५ टक्क्यांनी जास्त आहे. यंदाच्या १२ वीच्या परीक्षेत ७ लाख ५६ हजार २२६ मुले बसली होती. त्यापैकी ६ लाख ७६ हजार ९७२ म्हणजे ८९.५१ टक्के मुले उत्तीर्ण झाली. तर परीक्षा देणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या ६ लाख ६१ हजार ७४३ होती. त्यापैकी ९४.५८ टक्के विद्यार्थिनी यशस्वी झाल्या. याचप्रमाणे दहावीच्या परीक्षेत मुलींच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ९६.१४ टक्के असून मुलांची टक्केवारी ९२.३१ टक्के आहे. याचाच अर्थ नेहमीप्रमाणे मुलींनी निकालात बाजी मारली आहे. मुलींच्या उत्तीर्णतेची टक्केवारी मुलांपेक्षा ३.८३ टक्के जास्त आहे. सर्व विभागात दहावी बारावीत असेच मुलींचेच सर्वाधिक उत्तीर्ण व अव्वल दर्जाचे गुण घेण्याचे प्रमाण दिसून येत आहे. मुलांपेक्षा मुलींनीच नेहमीप्रमाणे या दोन्ही बोर्ड परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. ढोबळ मनाने विचार केला, तर आजच्या घडीला मुले हे मुलींपेक्षा शिक्षणात मागे आहेत हे वास्तव नाकारून चालणार नाही. याची कारणमीमांसा होणे देखील आवश्यक आहे...

माझा मुलगा अभ्यासच करत नाही. सतत खेळत राहतो. मित्रांसोबत फिरत राहतो . मोबाईलवर गेम खेळणे अथवा रिल्स किंवा इतर अनावश्यक व्हिडिओ पाहण्यात वेळ घालवतो ... सांगितलेले ऐकतच नाहीत.... अभ्यासासाठी एका ठिकाणी बसतच नाहीत... अशा ओरड पालकांकडून हमखास ऐकायला मिळतात . या सर्व तक्रारी ऐकल्यानंतर काही निष्कर्ष काढता येतील; परंतु हे सर्वच मुलांना लागू पडणार नाहीत. हे मात्र ध्यानात घ्यावे लागेल. अभ्यास करण्यासाठी आवश्यक असणारी 'बैठक क्षमता' मुलींमध्ये मुलांपेक्षा जास्त असते.'चंचल प्रवृत्तीमुळे' मुले अभ्यास करताना सतत ब्रेक घेत राहतात. अलीकडच्या काळात मुलांमध्ये विनम्रता कमी होत चालल्याचेही दिसून येत आहे. उद्धटपणे वागणे, गांभीर्य न पाळणे, वेळेचे नियोजन न करणे, निरर्थक चर्चेत वेळ घालवणे, अनुचित मार्गाचा अवलंब करण्यास प्राधान्य देणे, असे अनेक अवगुण मुलांना अभ्यासात मागे पडण्यास कारणीभूत ठरत आहेत. भारतीय पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये 'मुलगा म्हणजे वंशाचा दिवा', ही मानसिकता कळत नकळत आज देखील कुटुंब व्यवस्थेत दिसून येते. यामधून मुलांचा अति लाड केला जातो. लाडाने बिघडणे... हे मुलांच्या बाबतीत सर्रास घडून येत आल्याचे दिसते. मुलींसाठी शिक्षण म्हणजे अडथळ्याची शर्यतच असते. अजूनही मुलगी झाली की कुटुंबात आनंददायी घटना मानली जात नाही. वंशवेल म्हणून मुलीकडे पाहण्या इतकी मानसिकता बदलली नाही ;पण निदान या दृष्टीने मागील काही वर्षांपासून चर्चा सुरू झाली आहे. काही कुटुंबांनी एक अपत्य म्हणूनही मुलगी स्वीकारली हे शुभचिन्ह मानले पाहिजे. आजही ग्रामीण भागातच नव्हे तर शहरी भागातही मुलगा आणि मुलगी यांच्या शिक्षणाकडे भिन्न दृष्टीकोनातून पाहिले जाते.लग्नानंतर 'ती दुसऱ्या घरीच जाणार', हा पालकांचा पूर्वग्रह दृष्टिकोन मुलींच्या शिक्षणाबद्दल त्यांचा हात आकडता घेण्यास प्रवृत्त करत असतो. मागील वर्षी महाराष्ट्र शासनाने मुलींसाठी उच्च शिक्षण मोफत केले आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (एथड), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (डइइउ) तसेच, इतर मागास प्रवर्गातील (जइउ) मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कामध्ये ५० टक्के ऐवजी १०० टक्के शिक्षण शुल्क शासन भरणार, असा निर्णय घेतला आहे . या निर्णयामुळे राज्यातील मुलींना मोफत उच्च शिक्षणाचा लाभ मिळणार आहे. यात अभियांत्रिकी, मेडिकल, फार्मसीसह तब्बल ६४२ कोर्सेसचा समावेश आहे. हुशार असतानाही अनेक मुलींना आर्थिक परिस्थिती बिकट असल्यामुळे आपले शिक्षण अर्धवट सोडावे लागत होते. लवकर लग्न उरकून टाकले जायचे. या पार्श्वभूमीवर शासनाचा हा निर्णय क्रांतिकारक पाऊल ठरला आहे. सावित्रीच्या लेकी आज सर्व क्षेत्रात आघाड्या घेत आहेत. 'रांधा,वाडा, उष्टे काढा' याला मूठ माती देत 'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा!' हा मूलमंत्र त्या प्रत्यक्ष कृतीत आणत आहेत. त्यांच्यातील चिकाटी, सहनशीलता, कष्टाळूपणा आणि संधीचे सोने करण्याची क्षमता वाखणण्याजोगी आहे.

एकूणच दहावी-बारावीच्या निकालानंतर मुलांनी आत्मचिंतन आणि मुलींनी भविष्याचा वेध घेणे प्रासंगिक आहे. शैक्षणिक क्षेत्रात दोघात निकोप स्पर्धा अशीच राहणार आहे. दहावी-बारावीच्या परीक्षा या शैक्षणिक वाटचालीतील अंतिम टप्पे नसून, ती प्रवेशद्वारे आहेत.

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक श्री.शशिकांत आकाराम पाटील यांनी प्रीतिसंगम प्रिंटर्स, कोयना औद्योगिक वसाहत, मलकापूर-कराड येथे छापून गोदावरी प्लाझा, हेड पोस्टाजवळ, शनिवार पेठ कराड, येथे प्रसिद्ध केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. R.N.I.No.MAHMAR./२००१/१०३३८ रजिस्टर No.MAHMAR/14511/13/1/96/Te पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 *मुख्य कार्यालय:- गोदावरी प्लाझा, हेड पोस्ट जवळ, शनिवार पेठ कराड, जि.सातारा, पिनकोड - ४१५११० फोन (०२१६४)२२७७२५,,फॅक्स २२६९२५, * सातारा कार्यालय:- संजीवन सीटी स्कॅन शेजारी, सिव्हील हॉस्पिटल रोड, सातारा फोन नं:-९२२६३९८८१७ RNI.mar/२००१/१०३३८.
email-pritisangamkarad@gmail.com





# प्रीतिसंगम

www.pritisangam.com

सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर






वर्ष २९ वे | अंक १९ | पाने ८ | सोमवार | दि. १९ मे २०२५ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५


# सोलापूरातील कारखान्याला आग ;८ जणांचा मृत्यू

## टॉवेल कारखान्याला लागलेल्या आगीत मालकासह कामगारांचा मृतांमध्ये समावेश

**सोलापूर/प्रतिनिधीः-**

सोलापूर शहरातील अक्कलकोट रोड एमआयडीसी परिसरातील सेंट्रल टेक्सटाईल या टॉवेल कारखान्याला भीषण आग लागली होती. या आगीत तीन जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे. या आगीत आणखी चार ते पाच जण अडकल्याची माहिती मिळाली होती. दरम्यान, मागील १३ तासाहून अधिक वेळ आगीत अडकलेल्या पाच जणांना बेशुद्धवस्तेत अग्निशमाक दलाच्या जवानांनी बाहेर काढलं आहे. या पाचही जणांना सोलापूरच्या शासकीय रुग्णालयाकडे तातडीने रवाना करण्यात आलं होतं. मात्र, या पाचही जणांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळं या आगीत एकूण ८ जणांचा मृत्यू झाला आहे.



सोलापुरातील या आगीत अडकलेल्या पाच जणांना बेशुद्धवस्तेत अग्निशमन दलाच्या जवानांनी बाहेर काढलं आहे. या पाचही जणांना सोलापूरच्या शासकीय रुग्णालयाकडे तातडीने रवाना करण्यात आलं होतं. मात्र, या पाचही जणांचा मृत्यू झाला आहे. मागील जवळपास १३ तासाहून अधिक वेळ सोलापुरातला सेंट्रल इंडस्ट्री हा कारखाना आगीने धूमसत आहे. आग सध्या पूर्णपणे नियंत्रणात असून आधी आगीत अडकलेल्या चौघांना बाहेर काढण्यात आलं होतं. यामध्ये तिघांचा आधीच मृत्यू झाला आहे. तर आता पाच जणांना बेशुद्ध अवस्थेत हॉस्पिटलकडे रवाना करण्यात आलं आहे.

रुग्णसेवक बाबा मिस्त्री यांनी दिलेल्या माहितीनुसार, ज्या लोकांना बाहेर काढलेलं आहे ते देखील मृत अवस्थेत आहेत. सेंट्रल इंडस्ट्रीज या कारखान्याला लागलेल्या आगीत एकूण ८ लोकांचा मृत्यू झाला आहे. पहाटे साडेपाच वाजता तीन कामगारांचा मृत्यू झाला होता. सेंटर इंडस्ट्रीजचे मालक ही आतमध्ये अडकल्याची माहिती होती. त्यानुसार शोधकार्य पहाटेपासून सुरू होतं. हे सर्व पाच जण मास्टर बेडरुममध्ये लपून बसले होते. दुर्दैवाने त्यांना बाहेर पडता आला नाही. त्यामुळं श्वास गुदमरून आणि होरपळून त्यांचा जागीच मृत्यू झाला आहे. सर्व आठही मृतदेह हे सर्व शविच्छेदनासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयाकडे पाठवण्यात आले आहेत.

मृतांची नावे १) सेंट्रल इंडस्ट्रीचे मालक उस्मान मनसुरी (वय ८७), २) अनस मनसुरी (वय २४),३) शीफा मनसुरी (वय२४),४) युसूफ मनसुरी (वय १.६),५) आयेशा बागबान (वय ३८),६) मेहताब बागवान (वय ५१),७) हिना बागवान (वय ३५),८) सलमान बागवान (वय ३८).

सरकारला विनंती आहे की या सर्व प्रकरणाची सविस्तर चौकशी करण्यात यावी. महापालिकेची यंत्रणा काही प्रमाणात कमी पडल्याचे बाबा मिस्त्री म्हणाले. वेळोवेळी पाणी कमी पडत होते आणि जिल्हाधिकाऱ्यांना फोन करुन खासगी टँकरद्वारे पाणी मागून घेतले आहे. अडकलेल्या सर्व लोकांना बाहेर काढले जरी असले तरी आग अद्यापही विझलेली नाही, आग विझवण्यासाठी अद्यापही प्रयत्न सुरूच आहेत.

### भिंत फोडली

ही लागलेली आग विजवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करूनही आग विजवता येत नव्हती. शंभरच्यावर अग्नीशामक दलाच्या गाड्या आणल्या तरी आगीने रोद्ररूप धारण केले होते. अखेर आत अडकलेल्या कारखान्याच्या मालकाच्या कुटुंबाला बाहेर काढण्यासाठी जेसीबीच्या सहाय्याने भिंत फोडली व आत मध्ये प्रवेश केला मात्र यातील काहींना वाचवण्यात अपयश आले.






# कराडचे बसस्थानक राज्यात आदर्शवत करणार

## आमदार डॉ. अतुलबाबा भोसले ; नवीन पाच एसटी बसेसचे लोकार्पण

**कराड/प्रतिनिधी : -**

राष्ट्रीय महामार्गावरील वाहतुकीच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेल्या कराड बसस्थानकातील प्रवासी व कर्मचाऱ्यांसाठी राज्य शासनाच्या माध्यमातून अद्ययावत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच येत्या काळात कराड बसस्थानक हायटेक करून राज्यात आदर्शवत बसस्थानक करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांनी सांगितले.

आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांच्या प्रयत्नांतून कराड आगाराला मिळालेल्या नवीन पाच एसटी बसचे लोकार्पण आमदार डॉ. अतुल भोसले, आमदार मनोज घोरपडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी आमदार आनंदराव पाटील, अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अनिल घराळ, रणजीत पाटील, राजेंद्र यादव, राजेंद्र माने, काकासाहेब जाधव, आगार व्यवस्थापिका शर्मिष्ठा पोळ, विक्रम हांडे, सागर पांढरपट्टे, चालक, वाहक, सर्व एसटी कर्मचारी उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना आमदार डॉ. भोसले म्हणाले, कराड बस स्थानकातून दररोज पाच ते सहा हजार लोक प्रवास करतात. परंतु, आगारात कमी बसेस असल्याने प्रवाशांना त्रास सहन करावा लागत होता. याबाबत अनेकदा आंदोलनेही करण्यात आली. त्यानुसार प्रवाशांची गैरसोय दूर करण्यासाठी कराड आगाराला बस उपलब्ध करून देण्यासाठी आपण स्वत: परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेऊन वस्तुस्थिती मांडली. यावर मंत्री श्री. सरनाईक यांनी तत्काळ कराड आगाराला पाच बस उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले.



कराड : नवीन बसच्या उद्घाटनप्रसंगी आमदार डॉ. अतुलबाबा भोसले, आमदार मनोज घोरपडे, माजी आमदार आनंदराव पाटील, आगार व्यवस्थापिका शर्मिष्ठा पोळ व अन्य.

त्याचा आज लोकार्पण सोहळा पार पडला. दरम्यान, आपण कराडसाठी आणखी पाच बसेस देण्याची मागणी मंत्री श्री. नाईक यांच्याकडे केल्याचे आमदार डॉ. भोसले यांनी यावेळी सांगितले.

आमदार मनोज घोरपडे म्हणाले, प्रवाशांच्या सोयीसाठी आपण कटीबद्ध असून कराडला आणखी पाच बस व आवश्यक कर्मचारी उपलब्ध करण्यासाठी पाठपुरावा करणार आहे.

### अतुलबाबांनी केले नव्या बसचे स्वारथ्य

आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांच्या प्रयत्नातून कराड आगाराला नवीन पाच बसेस मिळाल्या. या नव्या कोऱ्या करकरीत बसचे स्वारथ्य करण्याचा मोह आमदार भोसले यांना आवडला नाही. त्यांनी बसचे स्टेअरिंग हातात घेऊन बसचे स्वारथ्य करण्याचा आनंद घेतला. तसेच बस वाहकाकडून रीतसर तिकीट घेऊन प्रवास करण्याचाही आनंद त्यांनी घेतला. त्यांच्यासोबत माजी आमदार आनंदराव पाटील यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

### प्रवाशांमधून समाधान

कराड आगारामध्ये एसटी बसची संख्या कमी असल्याने आगार व्यवस्थापनाला लांब पल्याच्या बसफेऱ्या बंद कराव्या लागल्या होत्या. तसेच उपलब्ध असलेल्या जुन्या बसच्या माध्यमातून तालुक्यातील प्रवासी सेवा सुरू होती. मात्र, मुदत संपत आलेल्या बस खुप जुन्या झाल्या असल्याने त्या रस्त्यात वारंवार बंद पडण्याचे प्रकार घडत होते. याचा प्रवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागत होता. अखेर गेल्या दोन महिन्यांत आठ व आता पाच अशा एकूण १३ एसटी बस कराड आगाराला उपलब्ध झाल्याने प्रवाशांमधून समाधान व्यक्त होत आहे.

### आणखी एका बसस्थानकासाठी प्रयत्नशील

कराड तालुका विस्ताराने मोठा आहे. तसेच कराड बसस्थानकातील प्रवाशांची संख्याही मोठी आहे. त्यामुळे प्रवाशांची चांगली सोय व्हावी, यासाठी कराड परिसरात आणखी एक बसस्थानक उभारण्यासाठी प्रयत्न सुरू असून लवकरच याबाबत बैठक आयोजित करण्यात येणार असल्याचे आमदार डॉ. भोसले यांनी यावेळी बोलताना सांगितले.

# कराडमध्ये मंगळवारी शिवसेनेतर्फे तिरंगा बाईक रॅलीचे आयोजन

**कराड/प्रतिनिधी : -**

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या आदेशानुसार शिवसेनेतर्फे कराड शहरात कराड नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष, शिवसेना नेते राजेंद्रसिंह यादव यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार (दि. २०) रोजी सकाळी ९.३० वाजता भव्य तिरंगा बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

शहरातील शिवतीर्थ दत्त चौकापासून या रॅलीला सुरुवात होणार आहे. त्यानंतर ही रॅली आझाद चौक, चावडी चौक, कन्या शाळा, कृष्णा नाका मार्गे विजय दिवस चौकात येऊन या ठिकाणी रॅलीची सांगता करण्यात येणार आहे.

पाकिस्तानचे कंबरडे मोडून ऑपरेशन सिंदूर यशस्वी पार पाडणाऱ्या भारतीय सैन्याच्या सन्मानार्थ ही तिरंगा रॅलीत कराड शहर व तालुक्यातील सर्व शासकीय, निमशासकीय, खाजगी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिक, पदाधिकारी, विद्यार्थी मित्र, सर्व सामाजिक संस्था, गणेश व नवरात्र मंडळे, पोलीस व सैन्य भरती प्रशिक्षण संस्था, माजी सैनिक यांनी भारतीय सैन्याच्या सन्मानार्थ मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे, असे आवाहन शिवसेना नेते, यशवंत विकास आघाडीचे अध्यक्ष राजेंद्रसिंह यादव यांनी केले आहे.

# साताऱ्यात अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**सातारा/प्रतिनिधी:**

अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी एकावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ऑक्टोबर २०२५ ते मार्च २०२५ या दरम्यान हा प्रकार घडला. या प्रकरणी सातारा शहरालगतच्या राकेश चंद्रकांत कदम याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस उपनिरीक्षक सावजी तपास करत आहेत.

# सामान्य जनतेचे प्रश्न प्राधान्यक्रमाने सोडविणार

## आ.मनोजदादा घोरपडे; साप येथे जनता दरबार उत्साहात

**कराड/प्रतिनिधी : -**

कराड उत्तर विधानसभा मतदारसंघातील सर्वसामान्य लोक अतिशय आशेने माझ्याकडे येतात. त्यांच्या डोळ्यात माझ्याबद्दल असलेला विश्वास बघून काम करण्यास अजून ऊर्जा मिळते. रक्ताच्या नात्यापेक्षा जास्त घट्ट आणि अतूट असं माझ्या जनतेसोबतच हे नातं वृध्दींगत होत चालले आहे, याचे निश्चितच समाधान आहे. जनता दरबाराद्वारे सामान्य जनतेचे प्रश्न प्राधान्यक्रमाने सोडविले जातील, अशी ग्वाही आमदार मनोजदादा घोरपडे यांनी दिली.



कराड उत्तर विधानसभा मतदारसंघात समाविष्ट असलेल्या कोरेगाव तालुक्यातील जनतेसाठी साप गावात शनिवारी जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. या माध्यमातून आमदार घोरपडे यांनी लोकांच्या भेटीगाठी घेऊन समस्या आणि अडचणी जाणून घेतल्या. याप्रसंगी जनतेशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी प्रांताधिकारी अभिजीत नाईक, तहसीलदार डॉ. संगमेश कोडे, पंचायत समितीच्या प्रशासक तथा गटविकास अधिकारी सुप्रिया चव्हाण, सहाय्यक गटविकास अधिकारी लालासाहेब गावडे यांच्यासह सर्व प्रशासकीय खाते प्रमुख उपस्थित होते.

प्रांताधिकारी नाईक यांनी कोरेगाव तालुक्यात राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती दिली. तसेच नागरिकांच्या अडचणी जाणून घेत सोडविण्याबाबत थेट आदेश महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिले.

सर्वसामान्य लोकांनी जनता दरबारामध्ये थेट आमदार मनोज घोरपडे यांच्याकडे विविध मागण्या करत निवेदने सादर केली. संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून नागरिकांच्या समस्या,अडचणी तात्काळ सोडवण्यासाठी पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना आमदार घोरपडे यांनी दिल्या. यावेळी शिधाकार्ड वाटप, श्रावणबाळ पेंशन योजनेतील लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले.

या दरबारात एकूण १५० तक्रारी आल्या. त्यातील ९० तक्रारी जागेवर सोडवण्यात आल्या. उर्वरित तक्रारी पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात आल्या. यावेळी वासुदेव माने, तुषार जाधव, तात्यासो साबळे, सागर गायकवाड, नागेश अडसूळ, भगवान कदम, रणजीत माने, सोमनाथ निकम, राजेंद्र मोरे, ऋषिकेश तुपे, ज्ञानेश्वर कदम आदी महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

# इस्लामपूर येथील जळीतग्रस्त सुर्यवंशी कुटुंबियास आ.जयंत पाटील यांनी भेट देऊन जळीताची पाहणी करून धीर दिला

**इस्लामपूर/प्रतिनिधी:**

हाकेच्या अंतरावर अग्निशामक दलाचे केंद्र असतानाही आमचा आयुष्यभर उभा केलेला प्रपंच जळाला. आम्हाला अग्नि शामक दलाची वेळेवर मदत मिळाली असती, तर आमचा प्रपंच वाचला असता. आता आम्ही पूर्ण उघड्यावर आलो, या शब्दात इस्लामपूर येथील जळीतग्रस्त योगेश विलास सुर्यवंशी व त्यांच्या कुटुंबियांनी आपला आक्रोश माजी मंत्री आ.जयंतराव पाटील यांच्यासमोर मांडला.

आ.पाटील यांनी सुर्यवंशी कुटुंबियांना भेट देऊन जळालेले घर, संसारोपयोगी साहित्य, गॅरेज, वाहनांची पाहणी करून सुर्यवंशी कुटुंबाला धीर दिला. आ. पाटील यांनी भेट दिली त्यावेळी, संपूर्ण सुर्यवंशी कुटुंबीय व त्यांचे काही नातेवाईक बेचीराख झालेले साहित्य बाहेर काढताना, काही वाचले आहे का? हे पहात होते. हे चित्र अतिशय विदारक होते.

इस्लामपूर येथील कापुसखेड रस्त्या वरील योगेश सुर्यवंशी यांच्या गॅरेजच्या दारात उभा असलेल्या दुचाकी वाहनास दि.१२ मे रोजी रात्री आग लागली. गाडीचा टायर फुटल्यानंतर योगेश व कुटुंबीय घराबाहेर आले. यावेळी त्यांचा लहान मुलगा इतक्या रात्रीही पळत अग्निशमन केंद्रात गेला, बऱ्याच हाका मारल्या, गाड्यांचे दरवाजे वाजविले, मात्र काहीही प्रतिसाद मिळाला नाही. जेव्हा गाडी आली तेंव्हा, आगीने चांगलाच पेट घेतला होता. त्यावेळी या गाडीमध्ये पुरेसे पाणीही नव्हते. घर व गॅरेजच्या दारातील दुचाकी वाहनास अचानक आग कशी लागली? हेही कळत नसल्याची भावनाही कुटुंबियांनी मांडली.

आ.पाटील यांनी सुर्यवंशी कुटुंबाचे म्हणणे ऐकून घेतले. यानंतर त्यांनी मी संबंधित अधिकाऱ्यांशी बोलून आपल्यासाठी काय करता येईल, ते बघू, असा धीर दिला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष शहाजी पाटील, माजी नगराध्यक्ष ॲड. चिमणभाऊ डांगे, सुभाषराव सुर्यवंशी, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष देवराज पाटील,माजी युवक शहराध्यक्ष सचिन कोळी, परेश पाटील, प्रदीप थोरात यांच्यासह कार्यकर्ते व त्या परिसरातील नागरिक उपस्थित होते.



इस्लामपूर येथील योगेश विलास सुर्यवंशी यांच्या जळालेले घर व गॅरेजची पाहणी करीत सुर्यवंशी कुटुंबियांची कैफियत ऐकताना माजी मंत्री आ.जयंतराव पाटील. समवेत शहाजी पाटील, ॲड.चिमण भाऊ डांगे,सुभाषराव सुर्यवंशी,देवराज पाटील,सचिन कोळी व इतर

# सरपंच,पोलीस पाटील यांचे खटक्यावर बोट जागेवर पलटी

## अवघ्या दोन तासात आमरण उपोषणावर निघाला तोडगा

**चरेगाव/प्रतिनिधी:**

कळंत्रेवाडी, ता.कराड येथील रहिवासी माजी सैनिक आनंदराव थोरात यांनी रविवार दिनांक १८ मे रोजी सकाळी आठ वाजल्यापासून अतिक्रमण प्रश्नी आमरण उपोषणाचे हत्यार उपसले होते. ग्रामपंचायत कार्यालयासमोर ते उपोषणास बसले होते.

दरम्यान,याची माहिती गावचे सरपंच श्री शंकर बाकले तसेच पोलीस पाटील श्री जयसिंग येळवे यांना कळताच त्यांनी उपोषणस्थळी भेट देऊन उपोषणकर्ते माजी सैनिक आनंदराव थोरात यांची समस्या जाणून घेत या प्रश्नी कायमस्वरूपी तोडगा काढण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार घटनास्थळी जाऊन दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेत योग्य तो तोडगा काढला.

दरम्यान, सरपंच व पोलीस पाटील यांनी काढलेला तोडगा दोन्ही बाजूंनी मान्य झाल्यामुळे उपोषणकर्ते माजी सैनिक आनंदराव थोरात यांनी अखेर आपले उपोषण स्थगित केल्याचे जाहीर केले. त्यामुळे प्रशासनासह गावकऱ्यांनी अखेर सुटकेचा विश्वास टाकला असून अवघ्या दोनच तासात अतिक्रमण प्रश्नावर तोडगा काढून उपोषणकर्ते माजी सैनिक आनंदराव थोरात यांना उपोषण स्थगित करायला लावल्याने सरपंच श्री शंकर बाकले तसेच पोलीस पाटील श्री जयसिंग येळवे यांच्या खटक्यावर बोट जागेवर पलटी या कार्यशैलीचा अनुभव गावकऱ्यांना आला असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.



# आरक्षण उपवर्गीकरण महाआंदोलनासाठी हजारो कार्यकर्ते मुंबईला जाणार

## संदीपतात्या ठोंबरे

**विटा/ प्रतिनिधी:**

एक ऑगस्ट रोजी अनुसूचित जातीच्या आरक्षण उप वर्गीकरणासाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करावी, यासाठी महाराष्ट्रातील मातंग समाजाच्या पुढाकाराने मुंबई आझाद मैदान येथे २० मे रोजी होणार्या जनआक्रोश महाआंदोलनासाठी पश्चिम महाराष्ट्रातून हजारोंच्या संख्येने अनुसूचित जातींच्या कार्यकर्ते, पदाधिकार्यांनी मुलांबाळासोबत मुंबईला उपस्थित राहावे, असे आवाहन सकल मातंग समाजाचे राज्य समन्वयक तथा फकीरा पँथर सेनेचे संस्थापक अध्यक्ष समाजभूषण संदीप तात्या ठोंबरे यांनी केले आहे.

विटा येथे पश्चिम महाराष्ट्रातील मातंग समाजाच्या वधू - वर सूचक मेळाव्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. प्रा. वसंतराव यादव, नंदकुमार सोनावले, डॉ. श्रीधर भिंगारदेवे, डॉ.विद्यादेवी सचिन ठोंबरे, दलित मित्र रामचंद्र भिंगारदेवे आदींची प्रमुख उपस्थिती होती



फकीरा पँथर सेनेचे संस्थापक अध्यक्ष समाजभूषण संदीप तात्या ठोंबरे पुढे बोलताना म्हणाले की, तेलंगणा, आंध्रप्रदेश या राज्यांनी अनुसूचित जातीचे आरक्षणाचे उप वर्गीकरण करावे, याला मान्यता दिली आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र सरकारने अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण तात्काळ करावे या मागणीसाठी जन आक्रोश महाआंदोलन २० मे रोजी आझाद मैदान, मुंबई येथे होणार आहे. राज्यातील मातंग समाजासहित अनुसूचित जातीच्या अनेक पक्ष, संघटना यांनी या आंदोलनाला मोठा पाठिंबा दिला आहे. त्यामुळे सदरचे आंदोलन यशस्वी करण्यासाठी पश्चिम महाराष्ट्रातील मातंग समाजाच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन रेल्वे, बस व मिळेल त्या वाहनाने घरातील भाकरी बांधून आंदोलन यशस्वी करण्यासाठी उपस्थित राहणे गरजेचे आहे.

अनुसूचित जातीच्या आरक्षण उपवर्गीकरण लढ्याचे हे ऐतिहासिक आंदोलन असून आता नाही तर कधीच नाही या उक्तीने राज्यातील मातंग समाज एकवटला आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या म्हणण्याप्रमाणे आता कुणी वळू नका, कोणी चळू नका. आता बिनी मारायसाठी लाखोंच्या संख्येने मुंबईला उपस्थित राहावे, यासाठी फकीरा पँथर सेनेच्या वतीने नियोजन केले आहे. आरक्षण उप वर्गीकरण लढ्यासाठी, या आंदोलनासाठी पुढाकार घेऊन फकीरा पँथर सेनेचे कार्यकर्ते कामाला लागले असल्याचे त्यांनी सांगितले. सांगली, सातारा, कोल्हापूर या जिल्ह्यातून मोठ्या संख्येने समाज बांधव मुंबईला जाणार असल्याची माहिती, यावेळी फकिरा पँथर सेनेचे संस्थापक अध्यक्ष तथा सकल मातंग समाजाचे राज्य समन्वयक संदीप तात्या ठोंबरे यांनी दिली.

यावेळी कार्यक्रमास भगवान लोंढे, दलित मित्र रामचंद्र भिंगारदेवे, ज्येष्ठ नेते शेखर तात्या भिंगारदिवे, इंजिनियर दुष्यंत कांबळे, डॉ.प्रथमेश भिंगारदिवे, डॉ.सचिन ठोंबरे, प्रा. महादेव कांबळे, प्रा.भगवान लोंढे, फकिरा पँथर सेनेचे राज्य समन्वयक सुभाष लांडगे, राज्य कार्यकारिणी सदस्य राहुल सकट, कडेगांव तालुक्याचे नेते संदीप देवकुळे, वाळवा तालुका अध्यक्ष महेश घस्ते, वसंतराव तुपे यांचेसह महिला कार्यकर्ते व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अलमट्टी धरणाची उंची वाढल्यास कोल्हापूर, सांगलीला मोठा फटका

## सर्वपक्षीय नेते आक्रमक ; चक्काजाम करत दिला इशारा

**शिरोळ/संदिप आडसूळ:**

कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्याला २००५, २०१९ आणि २०२१ साली महापुराचा मोठा फटका बसला. कमी वेळेत जास्त पाऊस पडल्याने आणि पंचगंगा तसेच कृष्णा नदीचे पाणी अलमट्टी धरण येथे अडवल्याने कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील नदीकाठच्या गावांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं होतं. असं असताना देखील कर्नाटक सरकारने अलमट्टी धरणाची उंची आणखी ५२४ मीटरपर्यंत वाढवण्याचा घाट घातला आहे. कर्नाटकच्या या भूमिकेविरोधात आज सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातील सर्वपक्षीय नेत्यांनी आंदोलन पुकारलं असून कोल्हापुरातील अंकली पुलाजवळ उदगाव येथे चक्काजाम आंदोलन करण्यात आले. सरकारने ठोस भूमिका घेतली नाही तर अलमट्टीपर्यंत जाऊन आंदोलन करण्याचा इशारा यावेळी आमदार सतेज पाटील आणि आमदार विश्वजीत कदम यांनी दिला आहे.





सांगली, कोल्हापूर जिल्ह्यातील कृष्णा, पंचगंगा, वारणा नदीकाठच्या गावांसह अन्य गावांना आलमट्टी धरणाच्या ५१९ मीटर उंचीमुळे महापुराचा फटका बसला असताना कर्नाटक शासनाने आलमट्टी धरणाची उंची ५२४ मीटर करण्याचा घाट घातला आहे. या धरणाची उंची वाढवल्यास कोल्हापूर तसेच कराडपर्यंत संपूर्ण गावे पूरग्रस्त बनणार आहेत. यामुळे अलमट्टीची उंची वाढवण्याचा कर्नाटकचा प्रयत्न हाणून पाडण्यासाठी व महाराष्ट्र शासनाला जागे करण्यासाठी अंकली पुलाजवळ आज सर्वपक्षीय नेत्यांकडून चक्काजाम आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात भाजप,काँग्रेस, शिवसेना, स्वाभिमानी शेतकरी संघटना, इरिगेशन फेडरेशन यांच्यासह इतर पक्षही सहभागी झाले होते. आमदार सतेज पाटील यांच्या नेतृत्वात झालेल्या या चक्काजाम आंदोलनात कर्नाटक सरकार, राज्य सरकार आणि केंद्र सरकारवर तीव्र नाराजी दर्शवत जोरदार टीका करण्यात आली. आलमट्टीची उंचीवाढीचा निर्णय जोपर्यंत रद्द होत नाही, तोपर्यंत सर्वपक्षीय आंदोलन सुरूच ठेवणार असल्याचा एल्गार यावेळी करण्यात आला तब्बल ३ तास चाललेल्या आंदोलनादरम्यान दोन्ही बाजूची वाहतूक आंदोलकांनी अडकल्याने वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. तर दुसऱ्या बाजूला सर्वाधिक महापुराचा फटका बसणारा शिरोळ तालुक्यात कडकडीत बंद ठेवून या चक्काजाम आंदोलनाला पाठिंबा देण्यात आला आहे कर्नाटक सरकारने अलमट्टी धरणाबाबतची भूमिका घेतली आहे. त्याविरोधात आम्ही सर्वजण एकत्र आलो आहोत. राज्य शासनाने घोषणा न करता निर्णायक भूमिका घ्यावी, अशी आमची अपेक्षा आहे.

राज्य शासनाने २१ तारखेला बैठक बोलावलेली आहे. या बैठकीत आम्ही आमची भूमिका मांडणार आहोत. राज्य सरकारने केंद्राकडे भूमिका मांडावी, जेणेकरून आम्हाला पुराचा धोका उद्भवणार नाही. जर असं झालं नाही तर अलमट्टी इथं जाऊन आंदोलन करण्याची तयारी केलेली आम्ही केलेली आहे. या संदर्भात निर्णय घ्यावा.

अलमट्टीच्या उंचीवाढीला जी आता स्थगिती आहे ती केवळ तेलंगणा आणि आंध्र प्रदेश राज्याने घेतलेल्या विरोधी भूमिकेमुळे आहे. यामध्ये महाराष्ट्र शासनाने आपली भूमिका जाहीर केली नाही. त्यामुळे सरकार किती खरं बोलतं आणि किती खोटं बोलतं हे या बैठकीतून समोर येईलच, अशी भूमिका काँग्रेस आमदार सतेज पाटील यांनी मांडली आहे.

# सुकुमार किल्लेदार यांच्या झाडाला १ किलोचा व्हिगोर सनोफरचा दर्जेदार सेंद्रिय केसर आंबा !

**विटा/प्रतिनिधी:**

सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील हातनूर या गावचे आंबा बागायतदार किल्लेदार परिवाराने शेतीबरोबर आंब्याचे उत्पादन घेतले आहे. हातनुर या ठिकाणी सुकुमार किल्लेदार यांच्या आंब्याच्या शेतामधील आंब्याच्या झाडाला चक्क १ किलो २० ग्रॅम चा केसरी आंबा मिळून आला आहे. हा आंबा वजन करून पाहिल्यानंतर तेवढाच भरला. पहिल्यांदाच एवढा मोठा भला आंबा झाडाला मिळून आल्याने आंबा उत्पादक शेतकऱ्यांच्या कुटुंबाला फार समाधान व आनंद वाटला.

किल्लेदार कुटुंबाने आंब्याच्या झाडाची धार्मिक विधीप्रमाणे पूजा केली. परमेश्वराचं लेणं कधी कुठे दिसेल ते सांगता येणार नाही असे म्हणत झाडाचा आंबा तोडू का नको, असे त्या कुटुंबाला वाटत होते. पण आंबा आलेला आहे, पाडाला ठेवून नाही चालणार झाडाला असे म्हणत शेवटी सुकुमार किल्लेदार व किल्लेदार कुटुंबाने हा आंबा तोडला.




आंबा पाहण्यासाठी आजूबाजूच्या मित्र परिवारांनी त्यांच्या आंब्याच्या बागेत गर्दी केली होती. केसर आंबा जर एका किलोच्या पुढे झाडाला मिळून येत असेल तर मग देवगड आणि हापूस याच्यापेक्षाही केसर आंबा बरा म्हणण्याची वेळ तीही व्हिगोर सनोफरचा आंबा म्हणून ओळखला जातो. दर्जेदार सेंद्रिय केसर आंबा म्हणून ह्या आंब्याचे नाव आवर्जून बाजारात घेतले जाते.



### अनाथांना किल्लेदार कुटुंबांकडून आंबे वाटप

प्रत्येक वर्षी आंब्याचा सिझन आला व आंबा तयार झाला की, अनाथांचे नाथ म्हणून सुकुमार किल्लेदार कुटुंब हे अनाथ आश्रममध्ये जाऊन त्या ठिकाणी असणार्या मायमाऊलींना हे आंबे वाटप करतात. या अनाथांनी आंबे खाताना त्यांच्या चेहर्यावरचा आनंद यातच आमचे समाधान, असे सुकुमार किल्लेदार यांनी सांगितले.

# पोक्सो प्रकरणी एकावर गुन्हा

**सातारा/प्रतिनिधी:**

अल्पवयीन मुलीचे फोटो तांत्रिक सहाय्याने एकत्र करुन युवकाने ते फोटो इन्स्टाग्राम या सोशल मिडीयावर पोस्ट करुन 'आमचे दोघांचे लव्ह अफेअर आहे,' असे म्हणत विनयभंग केल्याप्रकरणी सातारा शहर पोलीस ठाण्यात संशयितावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, ओंकार असे संशयिताचे नाव असून याप्रकरणी मुलीच्या आईने पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. ही घटना मे २०२४ पासून वेळोवेळी घडली आहे. संशयिताने मुलीचा मोबाईल नंबर घेवून तिच्याशी ओळख वाढवली. मुलगी अल्पवयीन आहे, हे माहीत असूनही तिचा पाठलाग करत तिची छेड काढून विनयभंग केला असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

# अंमली पदार्थाचे सेवन केल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा

**सातारा/प्रतिनिधी:**

अंमली पदार्थाचे सेवन केल्याप्रकरणी दोन जणांविरोधात सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, अंमली पदार्थाचे सेवन केल्याप्रकरणी दोघांवर सातारा तालुका पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल झाले आहेत. अन्सार सिकंदर वाघवाले (वय २१, रा. परळी ता.सातारा) व रोहित आनंदराव गायकवाड (वय २६, रा.परळी ता.सातारा) अशी दोघांची नावे आहेत. पोलिसांनी याप्रकरणी तक्रार दिली आहे. पोलिसांनी दोन्ही कारवाई परळी येथे केल्या आहेत.

# स्वच्छ सुंदर मसूरचे काही लोकांकडून विद्रूपीकरण

## स्वागत रस्त्यालाच घाणीचे साम्राज्यः दंडात्मक ठोस उपाय योजनांची गरज...!

***मसूर/प्रतिनिधी:***
करा़ड तालुक्यातील मसूर गावाने स्वच्छ सुंदर आणि आरोग्यदायी मसूर ची संकल्पना खऱ्या अर्थाने सत्यात उतरवली आहे मात्र दोन घंटागाडी असून सुद्धा काही नागरिक मसूरच्या काही भागात विशेषता वेशीच्या स्वागत द्वारच्या रस्त्याला दैनंदिन कचरा टाकून स्वच्छ सुंदर मसूरला गालबोट लावत मसूरचा चेहरा विद्रूप करण्याची मानसिकता वाढीस लागली आहे ही दुर्दैवी बाब असून यावर कठोर व दंडात्मक निर्बंध कोण घालणार? असा सवाल उपस्थित होत असून या कचऱ्यामुळे भटक्या कुत्र्यांची जमात जागोजागी वाढीस लागली आहे ही समस्या मसूरकरांच्यासाठी डोकेदुखी ठरली आहे यावर शासनाची ठोस उपाय योजना असणे गरजेचे आहे अशा खोडसाळ गोष्टीला पायबंध घालण्यासाठी दंडात्मक कारवाईची संकल्पना पुढे आली पाहिजे. अशी मागणी जोर धरू लागली आहे.

मसूर हे कराड तालुक्यातील राजकीय दृष्ट्या पुढारलेले आणि प्रतिष्ठेची महत्त्वाची गाव म्हणून प्रसिद्ध आहे मसूरमध्ये अनेक लोकप्रतिनिधी पदाधिकारी आहेत की ज्यांनी मसूरची लौकिकता कायम ठेवताना मसूरच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने योगदान दिले आहे त्यातूनच स्वच्छ सुंदर आणि आरोग्यदायी मसूर ची संकल्पना अस्तित्वात आली यापूर्वी मसूर ला कचरा गाडी म्हणजेच घंटागाडी ची ग्रामस्थातून वारंवार मागणी होत होती तेव्हा


मसूर मध्ये कुत्र्यांच्या झुंडीने थैमान घातले आहे

त्या वेळचे तत्कालीन उपसरपंच सावळाराम कांबळे यांच्या पाठपुराव्याने मसूरला घंटागाडी कार्यान्वित झाली सदरची घंटागाडी मसूर मधून रोज मुख्य रस्त्यावरून व गल्लीतून फिरून कचरा संकलित करत होती. त्यास नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत होता.

**स्वच्छ सुंदर मसूरची संकल्पना...!**
कालांतराने राजकीय मनोमिलनातून मसूर ग्रामपंचायत मध्ये सत्तांतर झाले युवा नेते पंकज दीक्षित सारखे अभ्यासू लोकनियुक्त सरपंच म्हणून एक कर्तुत्वान चेहरा मसूरला मिळाला त्यांनी विविध नाविन्यपूर्ण कल्पना राबवत मानसिंगराव जगदाळे व नंदकुमार जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ सुंदर मसूर निरोगी व आरोग्यदायी मसूर ची संकल्पना यामध्ये अमुलाग्र बदल केला जिल्हा परिषदेच्या माध्यमातून मसूर ला दोन घंटागाड्या सुरू झाल्या या दोन घंटागाडीतून मसूर मधील सर्व कचरा संकलित करून तो ट्रॅक्टरच्या माध्यमातून एकत्रित करीत त्याची सुका कचरा व ओला कचरा विघटन करून त्याची एक ठिकाणी विल्हेवाट लावायची ही कार्यपद्धती अमलात आणली.

स्वच्छ सुंदर मसूर साठी यापूर्वी व्ही डी के कंपनीचे योगदान लाभले त्यांचे कॉन्ट्रॅक्ट संपल्यानंतर मसूरचे सुपुत्र सुभेदार अशोक जगदाळे यांच्या लिजंड कंपनीने ना नफा ना तोटा या तत्त्वाखाली शिव धनुष्य हाती घेऊन मसूर साठी त्यांची सफाई कामगार कर्मचाऱ्यांची टीम सध्या कार्यरत आहे. त्यांच्या कार्यपद्धतीबद्दल मसूरकरांच्या समाधानाच्या प्रतिक्रिया आहेत.

**घंटागाड्यांची मसूरकरांना भुरळ...!**
सकाळ च्या प्रहरी धार्मिक सुमधुर गीताने आणि विविध मार्गदर्शन सूचना सांगत फिरणाऱ्या घंटागाडीतून मसूर गावचा संपूर्ण कचरा दोन घंटागाड्यातून दैनंदिन गोळा होत असून त्यांना नागरिकांचा चांगला प्रतिसाद

**मसूरच्या समस्या भाग ७**

आहे किंबहुना सकाळच्या घंटागाडी त नागरिकांना कचरा टाकण्याची एक चांगली सवयच लागून गेली आहे यामुळे जवळपास दीड ते दोन टन विविध कचरा या घंटागाडीतून दैनंदिन गोळा करण्यात येतो याशिवाय तुंबलेल्या नाल्यातील साफसफाई दैनंदिन करण्यात येते त्यामुळे मसूर मधील डासांचा प्रादुर्भाव बऱ्यापैकी कमी झाला आहे.

**स्वागत रस्त्यालाच घाणीचे साम्राज्य.!**
असे असले तरी मसूर मधील पश्चिम भागातील उंब्रज मसूर पुला नजीक पूर्वेला आरफळ कॉलनी रस्त्या नजीक कराड मसूर रस्त्याला मसूरच्या वेशीच्या स्वागत रस्त्याच्या आजूबाजूला काही नागरिक जाणीवपूर्वक दैनंदिन कचरा टाकून घाण करतात सदर कचऱ्यामध्ये चिकन चायनीज व इतर हॉटेल्स मधील खाद्यपदार्थ मोठ्या प्रमाणात या कचऱ्यात आढळते त्याचे दुर्गंधी सर्वत्र पसरते त्यातच पडणाऱ्या पावसाच्या पाण्यामुळे डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढतो ते नागरिकांच्या आरोग्यासाठी चिंतेचा विषय झाला आहे मसूरची घंटागाडी संजयनगर माळवाडी नजीक मसूर वस्ती बिरोबा रस्ता मसूर गावठाण आंबेडकरनगर ब्रह्मपुरी व्यापार पेठ बाजारपेठ असे संपूर्ण गावच्या परिसरातील कचरा संकलित करण्यात येतो तरीही वाघेश्वरच्या तर रस्त्याला ते आरफळ कॉलनी पर्यंत मोठ्या प्रमाणात गाण्याचे साम्राज्य उद्भवतो आहे मसूर ला दोन घंटागाड्या एक ट्रॅक्टर दिमतीला असताना काही बेफिकीर व विघ्न संतोषी मंडळी गावच्या मुख्यद्वारच्या रस्त्याकडेल घाणीचे साम्राज्य करून स्वच्छ व सुंदर मसूर संकल्पनेला गालबोट लावत आहेत ही विचित्र मानसिकता कुठेतरी


मसूरच्या स्वागत रस्त्याला असे जागोजागी कचऱ्याचे ढीग पडले आहेत.

थांबण्याची गरज आहे.

**घाणीच्या साम्राज्या बरोबरच कुत्र्यांच्या झुंडीची दहशत वाढली.!**
मसूरच्या पूर्व पश्चिम दक्षिण मार्गाच्या मुख्य प्रवेश द्वाराचा रस्त्याकडे ला विविध प्रकारचे घाणीचे साम्राज्य पसरल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे त्यातच या विविध प्रकारच्या कचऱ्यावर जागोजागी कुत्र्यांच्या झुंडी मोठ्या प्रमाणात वाढत आहेत कुत्र्यांच्या कळवंडी नागरिकांच्या जीवावर बेतत आहेत सदर कुत्र्याच्या झुंडी एवढ्या माणसाला आहेत की ते नागरिकांच्या अंगावर धावून जायला मागे पुढे पाहत नाही याशिवाय मसूरच्या काही भागात या कुत्र्याच्या झुंडी एवढ्या वाढल्या आहेत की रात्री अपरात्री अनेक मांजरे मारून टाकत आहेत दिवसभरात कोंबड्या फस्त करतात चारायला सोडलेल्या शेळी वर सुद्धा झडप करायला कुत्र्याचे टोळके मागे पुढे पाहत नाही मसूर मधील विविध ठिकाणच्या घाणीच्या साम्राज्य बरोबरच कुत्र्यांच्या टोळक्यांची दहशत मोठ्या प्रमाणात वाढत आहे मोठ्या माणसासह लहान मुलांच्या व महिलांच्या वानधारकांच्या अंगावर धावून जाण्याचे अनेकदा प्रकार घडले आहेत अशा सातत्याच्या दुर्लक्षितामुळे एखादा बाका किंवा गंभीर प्रकार व प्रसंग मसूरमध्ये घडू नये अशी मसूरकरांची मापक अपेक्षा आहे.

**मसूरचे विद्रूपीकरण थांबवा..! ठोस उपाययोजना करा...!**
मसूर वेशीच्या दिशेने टाकलेले घाणीचे साम्राज्य असो कुत्र्यांच्या झुंडींची दहशत असो याबाबत मसूरच्या ग्रामसभेत अनेकदा ग्रामस्थांनी तक्रारी मांडल्या चिकन मटन व्यवसायिक चायनीज गाड्या हॉटेल्स धाबे यांचे रॉ मटेरियल च्या विल्हेवाटीबाबत सर्वांना नोटीस पाठवून दंडात्मक कारवाईबाबत ग्रामसभेत चर्चा झाल्या मात्र त्याच्या विशेष उपाययोजना झाल्या नाहीत कचरा नक्की कुणाचा? कोण कुठे टाकतो? याबाबत ठोस पुरावे नसल्याने त्या घाणीच्या साम्राज्याची जबाबदारी कोणी घेत नाही मात्र कचरा कोणाचा आहे हे पाहिल्यानंतर निश्चित कळते याबाबत प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन याबाबत कायमस्वरूपी ठोस उपाययोजना करावी आणि वेशी बाहेर पडणाऱ्या दैनंदिन कचऱ्यामुळे मसूरच्या विद्रूप चेहऱ्याची व्याख्या बदलून खऱ्या अर्थाने स्वच्छ सुंदर निरोगी आणि आरोग्यदायी मसूरची संकल्पना खऱ्या अर्थात उतरावावी अशी मसूरकरांची मापक अपेक्षा आहे.

# कास धरणाची सुरक्षा व्यवस्था पुन्हा रामभरोसे

## पाण्यात बुडण्याच्या दुर्दैवी घटना रोखणार कशा ? दोन नळकऱ्यांवर एकशे चाळीस हेक्टर ची सुरक्षा व्यवस्था

***सातारा/प्रतिनिधी:***
सातारा शहराची तसेच तालुक्यातील सोळा गावांची वर्षभर पाण्याची तहान भागवणाऱ्या कास तलावाची सुरक्षा व्यवस्था एका दुर्दैवी घटनेने अधोरेखित झाली आहे .नऊ वर्षाच्या राकेश विश्वकर्मा या मुलाचा कास तलावात बुडून मृत्यू झाला त्यामुळे या महत्त्वपूर्ण पाणीपुरवठा उदगम स्थळाची सुरक्षा व्यवस्थाराम भरोसे राहिली आहे . कास तलावाच्या १४० हेक्टरच्या सुरक्षिततेसाठी केवळ दोन नळकरी असल्याने दुर्दैवी घटनांना पायबंद घालणे अडचणीचे होत आहे .

सातारकरांसाठी शनिवार रविवार हक्काचा पिकनिक स्पॉट म्हणून कास तलाव अत्यंत लोकप्रिय आहे . या तलावाचा १४० हेक्टरचा परिसर हा जावली तालुक्यात येतो .मात्र उत्साहाच्या भरात पाण्यात जाणे , पाण्यात उडी मारून धाडसाने पोहण्याचा आतातायीपणा करणे, धरणाच्या भिंतीवर वाहन घेऊन जाणे, सामिष मेजवान्या करून दारूच्या बाटल्या तेथेच फोडणे असे सर्रास प्रकार येथे चालतात या सर्व घटनांवर कार्यक्षेत्र असणाऱ्या मेढा पोलीस स्टेशनचे ५९ पोलीस कर्मचारी काहीही करू शकत नाही.

मुळात कास तलाव ते मेढा पोलीस स्टेशन हे अंतर ४१ किलोमीटर आहे त्यामुळे तेथे स्वमालकीच्या क्षेत्रात सुरक्षा व्यवस्था लावणे हे सातारा पालिकेचे काम आहे .याबाबतची माहिती घेतली असता सर्व परिसर हा दोन नळकऱ्यांवर अवलंबून आहे अशावेळी दुर्दैवी घटना घडल्यास शिवेंद्रसिंहराजे भोसले ट्रेकर्स ग्रुपला प्राचारण करावे लागते.

### चेनलिंक जाळीचा प्रस्ताव

सातारा पालिकेने कास तलाव धरणाची उंची वाढवली आणि सातारकरांना अर्धा टीएमसी पाणी वर्षभरासाठी उपलब्ध झाले. मात्र सुरक्षा व्यवस्थेत कोणतेही प्रावधान येथे नाही . कास तलावाच्या पश्चिमेला दाट झाडी असल्याने त्या दिशेने कोणीही या तलावात उतरण्याचे धाडस करत नाही मात्र कास गावाकडून धरणाच्या भिंतीकडे जाणारा रस्ता पालिकेने खोदून ठेवला आहे तसेच धरणाच्या भिंतीचा रस्ता गेटने बंद करण्यात आलेला आहे तरीसुद्धा वाहनसह धरणाच्या भिंतीवर जाण्याची स्पर्धा लागलेली असते .कास तलावाच्या जुन्या बंगल्याजवळ साधारण पंधरा फूट कास तलाव खोल असून साधारण सात ते आठ फुटापर्यंत गाळाने तो भरलेला आहे त्यामुळे येथे दुर्दैवी घटना घडल्यास बचाव कार्य प्रचंड अवघड होते .सातारा पालिकेने याबाबत तातडीने विचार करून कास तलावाच्या प्रवेश कर्त्या बाजूने चेनलिंग जाळी बसवण्याची प्रक्रिया प्रस्तावित केली आहे तसेच कास तलावाच्या अधिक सुरक्षिततेसाठी किमान सहा सुरक्षारक्षक असणे आवश्यक आहे .

# टोचन करून निघालेल्या कारला भरधाव ट्रॅव्हल्सची धडक

## डी मार्टनजीक अपघात; तीन जण जखमी

***कराड/प्रतिनिधी : -***
पुणे-बेंगलो आशियाई महामार्गावर बंद पडलेली इरटीगा कार टोव्हींग क्रेनला टोचन करून शोरूमला घेऊन जात असताना पाठीमागून भरधाव वेगाने आलेल्या ट्रॅव्हल्सने इरटीगा कारला ठोकरले. या अपघातात तीन जण जखमी झाले. मलकापूर (ता. कराड) गावच्या हद्दीत डी मार्टसमोर रविवारी रात्री १.३० वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला.

याबाबत सचिन गणपत रवले (वय ४०) रा. मालचौंडी ता. जावळी यांनी कराड शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार ट्रॅव्हल्स चालक संतोष केशव माने (रा. सांगली) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, सचिन रवले हे रविवारी दुपारी ४.३० वाजण्याच्या सुमारास कणकवली येथून कुटुंबीयांसमवेत त्यांच्या मालचौंडी या गावी निघाले होते. ते गगनबावडा येथील घाटात आले असता, त्यांची इरटीगा कार बंद पडली. म्हणून टोव्हींग क्रेनला इरटीगा कार टोचन करून ते कराड येथील शोरूमला चालले होते. कोल्हापूर-सातारा लेनवरून कराडकडे येत असताना रात्री



१.३० वाजण्याच्या सुमारास डी मार्टजवळ ते आले असता, पाठीमागून भरधाव वेगाने आलेल्या ट्रॅव्हल्सने इरटीगा कारला पाठीमागून जोरदार धडक दिली. यामुळे इरटीगा टोव्हींग क्रेनवर आदळली. यात इरटीगाची पुढची व मागची दोन्ही बाजूचे मोठे नुकसान झाले आहे.

या अपघातात अंकिता सचिन रवले, वेदांन्त सचिन रवले व प्रज्ञा राजेश कदम हे तीन जण जखमी झाले आहेत. यावेळी अपघातस्थळापासून निघालेल्या रयत क्रांती संघटनेचे तालुकाध्यक्ष विशाल पुस्तके यांनी जखमींना स्वत:च्या कारमधून कृष्णा रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले. याप्रकरणी पोलीस तपास करीत आहेत.

# अलमट्टी धरणाची उंची वाढवली तर सांगली, कोल्हापुरात नक्षलवादी तयार होतील

## खा. धैर्यशील मानेंचं चक्काजाम आंदोलनात वक्तव्य

***शिरोळ/प्रतिनिधी:***
अलमट्टी धरणाची उंची वाढवली तर सांगली, कोल्हापुरात नक्षलवादी तयार होतील, असे वक्तव्य खासदार धैर्यशील माने यांनी कोल्हापुरात चक्काजाम आंदोलनात केले. प्रस्तावित अलमट्टी धरणाची उंची वाढवण्याविरोधात आज (१८ मे) आंदोलन करण्यात आले. यावेळी बोलताना खासदार धैर्यशील माने यांनी चक्काजाम आंदोलनात हे वक्तव्य केलं.

धैर्यशील माने म्हणाले की, अलमट्टी धरणाची उंची वाढवली तर कोल्हापूर, सांगली या दोन्ही जिल्ह्यांना जलसमाधी मिळेल. आता धरणाच्या उंची वाढवण्यास स्थगिती मिळाली ती महाराष्ट्रामुळे नाही तर आंध्रप्रदेश आणि तेलंगणा यांच्यामुळे मिळाल्याचे त्यांनी म्हटले आहे. दोन्ही जिल्ह्यातील नागरिकांची भूमिका मी केंद्र सरकारकडे मांडणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दुसरीकडे, अलमट्टी धरणाची उंची वाढविण्यास महाराष्ट्र सरकारचा तीव्र विरोध असल्याच्या पार्श्वभूमीवर २१ मे रोजी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या सोबत मंत्रालय स्तरावर बैठक होणार असल्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी म्हटले आहे. या प्रश्नी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार हे देखील संवेदनशील आहेत. जलसंपदामंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या बैठकीमध्ये राज्य शासनाच्या वतीने करावयाच्या सर्व उपाययोजनांवर चर्चा करण्यात येणार असल्याचे पालकमंत्री आबिटकर यांनी सांगितले.

अलमट्टी धरणाचा पश्चिम महाराष्ट्रला धोका दुसरीकडे, अलमट्टी धरणामुळे सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यात महापुराची स्थिती गंभीर बनते. विशेषतः सांगली, मिरज आणि शिरोळ तालुक्यातील हजारो हेक्टर शेती पाण्याखाली जाते. त्यामुळे पिकांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होते. नागरी वस्त्यांमध्ये पाणी शिरल्याने



मालमत्तेचही प्रचंड नुकसान होते. जीवितहानीचाही मोठा धोका असतो. ५१९ मीटर उंची असताना ही स्थिती आहे. जर अलमट्टीची उंची सहा मीटरने वाढवून ती ५२४ मीटर केली तर महापुराच्या पाण्याची फूग आणखी वाढून स्थिती भयावह होणार आहे. त्यामुळे धरणाची उंची वाढविण्याला या दोन जिल्ह्यातून मोठा विरोध होत आहे.

## लोणारी-कोळी बंधू मित्र परिवाराच्या वतीने दहावी आणि बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार

***अक्कलकोट/प्रतिनिधी:***
आज सोलापूर येथे अरूणभाऊ वि. लोणारी(कोळी) बंधू मित्रपरिवार सामाजिक संस्था तथा सोलापूर जिल्हा कोळी महासंघाच्या वतीने १० वी १२ वी उत्तीर्ण मुला/मुलीचां सत्कार करण्यात आला, समर्थ-वाल्मिकी प्रतिमेचे पुजन समाजसेवक प्रतापसिंह (भाऊ)चव्हाण, प्रा रेवप्पा कोळी (झक्अ़दवी प्रदान) प्रा उमेश सोनवणे यांच्या हस्ते करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.



यावेळी उत्तीर्ण मुला/मुलींना शाल, फेठा, प्रमाणपत्र बुके देऊन पेढा भरविण्यात आला, या सत्कार कार्यक्रमास मा अरूणभाऊ लोणारी, शिवसेनेचे लहू गायकवाड, विध्यार्थी संघटनेचे विश्वनाथ प्याटी, मेंबर रामदास मगर, उज्वल दिक्षित, अजय माने, अनुभैय्या जमादार, अप्पू हिप्परगे, संकेत विभूते, रवि कोळी, अंबण्णा कोळी, भिमाशंकर जावळे, हणमंत कोळी, बबलू वग्गे, संजय कोळी,जक्कप्पा कोळी, राम लोणारी, अमोल कोळी, सुमित भिसे, कर्मचारी शंकर कोळी, गवळी, भिमा गायकवाड व समस्त समाज बांधव / भगिनी/ विध्यार्थी /विध्यार्थीनी/ मित्रपरिवार उपस्थित, प्रास्ताविक भाषण संस्थेचे अध्यक्ष सागर लोणारी यांनी केले, सुत्रसंचालन शशिकांत वसंतपुरे यांनी केले आभार परमेश्वर जमादार यांनी मानले.


## ग्रामपंचायत मौजे इंदोली

### ता.कराड, जि.सातारा

ग्रामपंचायत इंदोली कडील खालील नमुद कामाची निविदा मान्यता प्राप्त निविदा धारकाकडून मागविणेत येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजपत्र रक्कम |
|---|---|---|---|
| १ | वडगाव रोड पोल शिप्टींग करणे | ग्रामनिधी | ५५०००/- |
| २ | बंधारा रोड ते पांडूरंग माने घर ७ पोल स्ट्रटलाईट वाया वाढवणे | ग्रामनिधी | ५३४३१/- |
| ३ | स्मारक परिसरातील स्ट्रीटलाईट पोल शिप्टींग करणे | ग्रामनिधी | १५०५००/- |
| ४ | ग्रामपंचायत अंतर्गत बंदीस्त गटर | ग्रामनिधी | ९२०००/- |
| ५ | ग्रामपंचायत इमारत प्लॅन,थ्रीडी डिझाईन अंदाजपत्रक बनवणे. | ग्रामनिधी | ४००००/- |
| ६ | संत रोहिदासनगर इंदोली येथे बंदिस्त पाईपिंग गटर करणे. | १५ वा वित्त आयोग २०२३-२४ | १८३०००/- |

कामाच्या अटी व शर्तीः
१)कामाचे निविदा फॉर्म जाहिरात प्रसिद्ध केले पासून २२/०५/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळून मिळतील.
२)कामाची निविदा स्वतंत्र व सीलबंद लखोट्यात कामाचे नाव नमूद करून दि.२२/०५/२०२५ सायंकाळी ५.०० वा पर्यंत स्वीकारली जाईल.
३)सर्व शासकीय कपाती ह्या बिलातून कपात केल्या जातील.
४)निविदा मंजूर अथवा नामंजूर करणेचा अधिकार ग्रा.पं. इंदोली यांनी राखून ठेवला आहे.
५)कामाची संबंधित अंदाजपत्रके कार्यालयीन वेळेत ग्रा.पं.इंदोली येथे पहावयास मिळतील.
६)काम वेळेत पूर्ण न झालेस कोणतीही पूर्वसूचना न देता काम रद्द केले जाईल.
७)अंदाजपत्रकातील तरतुदी प्रमाणे काम न झालेस कोणतीही पूर्वसूचना न देता काम रद्द केले जाईल.
८)लखोटा क्र.१ मध्ये सर्व आवश्यक कागदपत्रे, छायांकित प्रत व बयाणा रक्कम चलन जोडणे तद्नंतर लखोटा क्र.२ उघडणेत येईल.
९) कामाचे मोजमाप झाल्यानंतर पीएफएमएस प्रणालीद्वारे अदा करण्यात येईल.

सदर कामी विहित मुदतीत न आलेल्या बयाणा रक्कम न भरलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत. तसेच दरपत्रके सीलबंद करून कामनिहाय नाव व पत्यासह देणे.

**सही/-**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत इंदोली**
**ता.कराड जि.सातारा**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत इंदोली**
**ता.कराड जि.सातारा**


# सह्याद्री व्याघ्र प्रकल्पग्रस्तांचे आडोशी तील जंगलातच ठाण

## चुली मांडून तिथेच थाटला संसार ; कुटुंबियांसमवेत जंगलातच रात्र जागविली

***सातारा/प्रतिनिधी:-***
सातारा जिल्ह्यातील सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात बाधित झालेल्या जावली, महाबळेश्वर तालुक्यातील आडोशी, माडोशी, रवंदी, खिरखिंडी, कुसापूर, तांबी,वासोटा येथील प्रकल्पग्रस्त आपल्या मूळ गावी पुन्हा येऊन दाखल झाले आहेत. जंगलातील कोअरझोन मधील क्षेत्रात त्यांनी ठाण मांडून संसार थाटला. भिवंडी तालुक्यातील एकसळ, सागाव येथे झालेले पुनर्वसन मान्य नसून तेथील आदिवासी आम्हाला जगू देणार नाहीत, पुनर्वसनाच्या चांगल्या सुविधा नाहीत त्यामुळे आम्ही आता येथेच राहणार व इथेच मरणार अशी भूमिका घेत प्रकल्पग्रस्तांनी आडोशीतील मूळ गावच्या जंगलातच चुली पेटवल्या आणि रात्र जागवली.

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या जावली, महाबळेश्वर तालुक्यातील आडोशी, माडोशी, रवंदी, खिरखिंडी, कुसापूर, तांबी, वासोटा येथील प्रकल्पग्रस्तांचे एकसळ, सागाव ता. भिवंडी जि. ठाणे या ठिकाणी २०१५ साली पुनर्वसन करण्यात आले. एकूण १२० प्रकल्पग्रस्त खातेदारांकरीता त्या ठिकाणी केंद्र शासनाकडून २४२ हेक्टर जागा दिली होती. मात्र पहिल्या टप्प्यामध्ये सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रात वास्तव्य करणाऱ्या एकूण ७० कुटुंबांचे पुनर्वसन त्या ठिकाणी करण्याचे व्याघ्र प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांनी ठरवले. त्यापैकी खिरखंडी येथील सहा कुटुंबे वगळता त्या ठिकाणी बाकीचे प्रकल्पग्रस्त वास्तव्यास गेले. मात्र गावातील असलेल्या आदिवासी लोकांचा त्रास, मारहाण या लोकांना गेल्या दहा वर्षापासून त्या ठिकाणी होत आहे. त्या त्रासाला कंटाळून तसेच पुनर्वसनासाठी दिल्या जाणाऱ्या रस्ते, पाणी, वीज यासह अन्य सुविधांचा अभाव असल्यामुळे प्रकल्पग्रस्तांनी आपल्या मूळ गावी परतण्याचे निश्चित केले.

शुक्रवारी सकाळी साडेदहा वाजता एकसळ सागाव जि. ठाणे येथून सुमारे २२ प्रकल्पग्रस्त मिनी ट्रॅव्हल्सने माबळेश्वरात आले. तेथून कुरोशी पुलावरून वाघावळे, उचाट, आकल्पे येथे पोहोचले. त्यानंतर आकल्पे तून पायी चालत दुपारी बाराच्या सुमारास आडोशी हे मूळ गाव त्यांनी गाठले. तेथील पडक्या, उद्ध्वस्त झालेल्या शाळेच्या इमारती समोर संसार मांडून तेथे ठाण ठोकले. त्यानंतर प्रकल्पग्रस्तांनी मूळ गावी येण्याची भूमिका स्पष्ट करून आता आम्ही येथेच राहणार आणि इथेच मरणार असा आक्रमक पवित्रा घेतला.

यावेळी सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाची वनपरिक क्षेत्र अधिकारी



अक्षय करमळकर तसेच बामनोरी परिक्षेत्र अधिकारी विजय भाटे मीठा पोलिस ठाण्याचे सहाय्य पोलीस निरीक्षक सुधीर पाटील यांनी घटनास्थळी जाऊन प्रकल्पग्रस्तांशी चर्चा केली. परंतु प्रकल्पग्रस्त मागण्यांशी ठाम रहात भुमिकेत बदल न करता त्यांनी त्याच ठिकाणी चुली पेटवून संसार थाटला. शुक्रवारची संपूर्ण रात्र आडोशी तील जंगलातच जागविली.

**पायी मार्गाने चालत मुळ गाव गाठलेच**
सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांनी प्रकल्पग्रस्तांच्या जंगलातील मूळ गावी येऊ नये म्हणून सर्व प्रकारची यंत्रणा कार्यान्वित केली होती. ड्रोनच्या साह्याने प्रकल्पग्रस्तांवर नजर ठेवली होती .तर बफर क्षेत्रातील बोटी कोअर क्षेत्रात येऊ दिल्या नाहीत. त्यामुळे व्याघ्र प्रकल्पग्रस्त हे कोअर क्षेत्रात बोटीने न जाता सुमारे दहा ते पंधरा किलोमीटर अंतर चालत पायी मार्गाने आपल्या मूळ गावी पोहोचले.

**शाळेच्या बंद शेडमध्ये म्हशीचे सांगाडे**
ज्यावेळी सर्व प्रकल्पग्रस्त आडोशी येथील त्यांच्या मूळ गावातील शाळेसमोर पोहोचले त्यावेळी त्यांनी जुन्या पडक्या शाळेमध्ये आसरा घेण्याचे ठरवले. मात्र या शाळेतील खोलीमध्ये मेलेल्या म्हशीचे सांगाडे आढळून आले. दुर्गंधीही पसरली होती. या म्हशी प्रकल्पग्रस्तांच्या असल्याचे बोलले जात होते तर मेलेल्या म्हशीचे सांगाडे पाहून वृद्ध प्रकल्पग्रस्तांना अश्रू अनावर झाले.

**निवेदन देऊनही अधिकाऱ्यांची चालढकल...**
तानसा नदीवरील एकसळ, सागाव या ठिकाणी येथील ७० कुटुंबांचे पुनर्वसन करण्यात आले असून त्या ठिकाणी दिलेली जागा दलदलीची आहे. शेती करण्या योग्य नाही, बांधलेल्या घरांना भेगा गेल्या आहेत, पावसाळ्यात जमीन खचत आहे. चिखल तुडवत शेताकडे जावे लागते. १८ नागरी सुविधांपैकी बहुतांश सुविधा त्या ठिकाणी दिल्या गेल्या नाहीत. रेशन कार्ड दिले आहे मात्र त्यावर ऑनलाईन नसल्याच्या कारणास्तव रेशन मिळत नाही.

गुरांसाठी चरण्यासाठी गायरान नाही. त्यामुळे चारा उपलब्ध होत नाही. ज्या ठिकाणी जागा वाटप केली त्यातील बहुतांश जागेवर आदिवासी लोकांनी अतिक्रमण केले आहे. सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाचे अधिकारी, वनविभाग, पुनर्वसन विभाग, ठाणे, सातारा जिल्हाधिकारी यांना वारंवार निवेदन देऊनही आजपर्यंत सह्याद्री व्याघ्र प्रकल्पग्रस्तांचा कोणताही प्रश्न निकाली न लागल्याने आम्ही शेवटी आमच्या मूळ गावी परतलो आहोत. शासनाने आम्हाला येथेच मरण्याची परवानगी द्यावी अशी भावना प्रकल्पग्रस्तांनी अधिकाऱ्यांसमोर व्यक्त केली.

# कोरेगाव-कार्वे दोन गटात तुंबळ मारामारी

## यात्रेवेळी डीजे आणि फलक लावण्याच्या कारणावरून वाद

**कराड/प्रतिनिधी:-**

कोरेगाव-कार्वे (ता. कराड) येथे गावच्या यात्रेवेळी डीजे आणि फलक लावण्याच्या कारणावरून दोन गटात तुंबळ मारामारी झाली. शनिवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. याप्रकरणी कराड ग्रामीण पोलीस ठाण्यात परस्परविरोधी फिर्यादी दाखल झाल्या असून दोन्ही गटातील एकुण चौदा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अक्षय अरुण सावंत याने दिलेल्या फिर्यादीवरून, सुरज दळवी, ओंकार सावंत, सिद्धार्थ पाटील, ओमसाई सावंत, शंभू सावंत, ऋषिकेश सावंत (सर्व रा. कोरेगाव) यांच्यावर गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, गावच्या यात्रेवेळी शाळेजवळ बॅनर लावण्याच्या कारणावरून संशयितांनी हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करीत ठार मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. तसेच संशयितांनी लाकडी दांडक्याने मारहाण केल्यामुळे अक्षय सावंत हे जखमी झाल्याचेही फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी सहा जणांवर गुन्हा नोंदविण्यात आला आहे. याप्रकरणी हवालदार कांबळे तपास करीत आहेत.

तर याउलट सुरज विलास दळवी याने फिर्याद दिली आहे. त्याच्या फिर्यादीवरून ऋषिकेश उर्फ अक्षय अरुण सावंत, पंकज सावंत, उदय सावंत, अरुण सावंत, अविनाश सावंत, भानुदास सावंत, जालिंदर सावंत यांच्यासह अन्य एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात्रेत डीजे लावायचा नाही असे का म्हणतोयस, असे म्हणून संशयितांनी शिवीगाळ, दमदाटी करून कोयत्याच्या मुठीने मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. तसेच संशयितांनी सुरज दळवी याच्यासह त्याची आत्या व मामालाही लाकडी दांडक्याने मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी आठ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी हवालदार बैले तपास करीत आहेत.




प्रोप्रायटर विजय विठ्ठलराव निकम
सेंट पॉल स्कूल समोर सिव्हिल हॉस्पिटल रोड,सातारा
मो.नं.९०११२३९९९३


# एक देश एक निवडणूक' समितीचा माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाणांशी संवाद

**कराड/प्रतिनिधी:-**

'एक देश एक निवडणूक' विधेयकबाबत केंद्र सरकार कडून स्थापन केलेल्या संयुक्त संसदीय समितीचे सदस्य १७ ते १९ मे दरम्यान तीन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर आहेत. या समितीने राज्याचे गृह, अर्थ, विधी, शिक्षण, शिष्टाचार, निवडणूक या विभागांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर, तसेच राज्यातील प्रमुख पक्षांच्या नेत्यांशी चर्चा केली. खा. पी.पी. चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली ३१ खासदारांची ही समिती सर्व राज्यांतील वरिष्ठ अधिकारी व राजकीय नेत्यांशी चर्चा करीत आहेत. आता ही समिती तीन दिवसाच्या महाराष्ट्र दौऱ्यावर आहे.

यावेळी समितीने माजी मुख्यमंत्री, सर्व प्रमुख पक्षाचे प्रदेशाध्यक्ष व प्रमुख नेते यांच्याशी चर्चा केली. यावेळी मुंबई येथे माजी




मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्यासह राज्यातील प्रमुख नेत्यांशी सविस्तर आणि दीर्घ चर्चा केली. याप्रसंगी राष्ट्रवादीच्या खा. सुप्रिया सुळे, काँग्रेसचे खा. मनीष तिवारी, शिवसेनेचे खा. अनिल देसाई, आपचे खासदार संजय सिंह, भाजप खा. अनुराग ठाकूर, खा. संबित पात्रा, समाजवादी पार्टीचे आ. अबू आजमी, रासप नेते महादेव जानकर, आदीसह राज्यातील प्रमुख नेते यावेळी उपस्थित होते.

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी संयुक्त समितीसमोर 'एक देश एक निवडणूक' या महत्वाच्या विधेयकबाबत महत्वपूर्ण चर्चा करीत आपले मुद्दे मांडले. एक देश एक निवडणूक देशासाठी योग्य की अयोग्य याचा अहवाल समिती तयार करणार असून, समितीत भाजपचे १०, काँग्रेसचे ३, समाजवादी, तृणमूल काँग्रेस, डीमके, टिडीपी, राष्ट्रवादी, आरएलडीचे एकूण २१ सदस्य आहेत.

## अडीच लाखांच्या चोरी प्रकरणी मोलकरणीवर गुन्हा

**सातारा/प्रतिनिधी:-**

अडीच लाखांच्या चोरी प्रकरणी मोलकरणीविरोधात शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, घरकाम करणार्या महिलेने अडीच लाख रुपये किंमतीचा ऐवज चोरी केला असल्याचा गुन्हा शाहूपुरी पोलीस ठाण्यात दाखल झाला आहे. सोन्याचा गंठण, सोन्याचे तोडे, सोन्याच्या रिंगा, सोन्याची चैन असा मुद्देमाल आहे. पोलीस तपास करत आहेत.

## आयशर टेम्पोच्या धडकेत महिला जखमी

**सातारा/प्रतिनिधी:-**

आयशर टेम्पोच्या धडकेत दुचाकीवरील महिला जखमी झाल्याची नोंद सातारा शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, कोडोली येथे आयशर व दुचाकीचा अपघात होवून दुचाकीवरील महिला जखमी झाली. लक्ष्मी अजित मोरे (वय ३६, रा. दुदुस्करवाडी ता.जावली) असे जखमी महिलेचे नाव आहे. याप्रकरणी आयशर टेम्पो चालक सचिन सपकाळ (रा.शिवथर ता.सातारा) याच्यावर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. हा अपघात १५ मे रोजी झाला आहे.








